| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ४७ वा | सोमवार, दिनांक ०४ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

लातूर समाचार रोज वाचा ऑनलाईन www.latursamachar.com वेबसाईट वर..

## पश्चिम बंगाल, पुद्दुचेरी मध्ये कमळ फुलले



**नवी दिल्ली /वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. पश्चिम बंगाल, आसाम, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि केरळ या पाचही राज्यांमध्ये सोमवारी सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. यामध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपला घवघवीत यश मिळाले. तर आसामध्येही भाजपने पुन्हा एकदा सत्ता राखण्यात यश मिळवले तर केरळमध्ये डाव्यांचा शेवटचा गड पडला असून याठिकाणी काँग्रेसची सत्ता येण्याची शक्यता आहे. तर तामिळनाडूमध्ये विजय थलपति याच्या टीव्हीके पक्षाने मुसंडी मारत द्रमुक आणि अण्णाद्रमुकला मागे टाकले. तर पुद्दुचेरीमध्येही भाजपने यश मिळवले आहे.

पाच राज्यांच्या निवडणुकीत मिळालेल्या या यशामुळे भाजपची देशभरातील ताकद आणखी वाढली आहे. त्यामुळे आगामी काळात भाजप आणखी आक्रमक राजकारणाचे धोरण अवलंबू शकते. या निकालातून आता विरोधक काय धडा घेणार आणि यापुढे कशाप्रकारची रणनीती आखणार, हे पाहावे लागेल.



### आसामध्ये भाजपची हॅट्रिक निश्चित

ईशान्येकडील महत्त्वाच्या आसाम राज्यात भाजपने आपली सत्ता कायम राखली आहे. १२६ पैकी ९९ जागांवर भाजपप्रणित एनडीए आघाडीवर असून, मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांची रणनीती यशस्वी ठरल्याचे दिसत आहे. काँग्रेसप्रणित आघाडी केवळ २५ जागांवर अडकली आहे.

## तामिळनाडू मध्ये 'विजय' थलपतीचाच

**चेन्नई/वृत्तसंस्था :** काही घटना या चमत्कारिक असतात. त्यामुळे प्रत्येकाला या घटनांचं आश्चर्य आणि अप्रूप वाटत असते. महाराष्ट्रात एक अभिनेता मुख्यमंत्री होऊ शकतो का? असा प्रश्न विचारला तर निश्चितच नाही असे उत्तर येईल. पण तामिळनाडूत या गोष्टी अपवाद आहे. इथे सिनेमातले 'हिरो' हे नागरिकांच्या खऱ्या आयुष्यातही 'हिरो' बनताना दिसतात. हे हिरो केवळ चित्रपटांपुरते मर्यादीत राहत नाहीत. त्यांना आपल्या भाषेप्रती, आपल्या राज्याप्रती आणि आपल्या नागरिकांप्रती इतकं प्रेम आणि जिव्हाळा असतो की, त्यांनी निवडणूक लढवली तरी जनता त्यांना भरघोस प्रतिसाद देवून निवडून आणू शकते. मग समोर कितीही मोठे आणि जुने पक्ष असले तरी जनतेचा कौल अभिनेत्याच्या बाजूने जाऊ शकतो. थलपती विजय हा त्याचा जिवंत उदाहरण आहे.

अभिनेता थलपती विजय याचा तामिळनाडूत जलवा बघायला मिळत आहे. थलपती विजय याला तामिळनाडूच्या जनतेने भरभरुन मतदान केलं आहे. सकाळपासून सुरु असलेल्या मतमोजणीत थलपती विजय याचा ढतघ पक्ष सर्वात जास्त आघाडीवर दिसत आहे. विशेष म्हणजे सत्ताधारी ऊ्वघ पक्ष हा थेट तीन नंबरवर गेला आहे. तर AIADMK पक्ष सध्या दुसऱ्या क्रमांकावर आघाडीवर आहे. DMK आणि AIADMK हे पक्ष अनेक वर्षांपासून तामिळनाडूत आहेत. दोन्ही पक्षांची अनेकदा तामिळनाडूत आलटूनपालटून सत्तादेखील राहिलेली आहे. पण या दोन्ही पक्षांच्या वर्चस्वाला थलपती विजयने जोरदार धक्का दिला आहे. विजयने तामिळनाडूत करुन दाखवलं आहे. विजयचा टीव्हीके पक्ष हा १५० पेक्षा जास्त जागांवर आघाडीवर दिसत आहे. त्यामुळे विजय हा मुख्यमंत्री होतो का? ते पाहणं



औत्सुक्याचं आहे. या निवडणुकीत थलपती विजय या पक्ष जिंकल्यास एक नवा इतिहास रचला जाणार आहे. स्वतःचा पक्ष स्थापित करून तामिळनाडूत सत्तेत येणारा तो पहिला अभिनेता ठरणार आहे. याआधीचे अभिनेते सत्तेत आले ते आधीपासूनच असलेल्या पक्षांच्या बळावर आलेले बघायला मिळाले आहेत.

### तामिळनाडूचा एकपर्यंत निकाल काय?

एकपर्यंत समोर आलेल्या कलांनुसार, तामिळनाडूत TVK पक्ष १६० जागांवर आघाडीवर आहे. तर DMK पक्ष ३१ जागांवर आघाडीवर आहे. AIADMK पक्ष २१ जागांवर आघाडीवर आहे. भाजप २ जागांवर आघाडीवर आहेत. तर इतर ६ जागांवर आघाडीवर आहेत.

### दुपारी ०२ पर्यंत हाती आलेले कल..

**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचा निकाल**

भाजप- १९० तृणमूल काँग्रेस- ९४
काँग्रेस -२ डावे पक्ष- २
इतर-२

**केरळ विधानसभा निवडणुकीचा निकाल**

काँग्रेस-९८
डावी आघाडी -४०
इतर-२

**तामिळनाडू विधानसभा निवडणुकीचा निकाल**

द्रमुक- ६०
अण्णाद्रमुक-६५
टीव्हीके-१०९
इतर-९


**पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीचा निकाल**

भाजप- २२
काँग्रेस-६
इतर-१

**आसाम विधानसभा निवडणुकीचा निकाल**

भाजप-९७
काँग्रेस- २४
इतर-५

## प्रचंड बहुमतांनी सुनेत्रा पवार विजयी!



Sunetra Ajit Pawar
@SunetraA_Pawar
Show translation
आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास मी आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते.

आजचा हा निकाल जाहीर होत असताना आदरणीय दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत. दादांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे की, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया.

दादांच्या स्वप्नातील बारामती घडवण्याची संधी मला दिल्याबद्दल मी सर्व बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार मानते. हा शेवट नाही, ही तर फक्त सुरुवात आहे.
निर्धाराची, संघर्षाची आणि नव्या बारामतीची!

**बारामती/प्रतिनिधी : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकालाचे चित्र आता स्पष्ट झाले असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) उमेदवार आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विजयाकडे मोठी झेप घेतली आहे. नवव्या फेरीअखेर मिळालेल्या आकडेवारीनुसार, सुनेत्रा पवार यांचा विजय आता केवळ औपचारिकता उरला आहे. विजयाचे चित्र स्पष्ट होताच सुनेत्रा पवार यांनी एक्सवर पोस्ट करत आपल्या भावना व्यक्त केल्या.**

### महाराष्ट्र पोट निवडणूक

**बारामती निवडणुकीचा निकाल**

**दु.०२ पर्यंत सुनेत्रा अजित पवार**
**२ लाख १८ हजार ९३० मतांची आघाडिवर**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकालाचे चित्र आता स्पष्ट झाले असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) उमेदवार आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विजयाकडे मोठी झेप घेतली आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी विक्रमी कामगिरी करत माजी आमदार अजित पवार यांच्या २०१९ मधील मताधिक्याचे सर्व रेकॉर्ड मोडीत नवा रेकॉर्ड बनवला आहे. २४ च्या फेरीअखेर मिळालेल्या आकडेवारीनुसार, सुनेत्रा पवार यांचा विक्रमी विजय झाला आहे. सुनेत्रा पवार २ लाख १८ हजार ९३० इतक्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या आहेत.

## अल्पवयीन मुलीवर पित्याकडूनच अत्याचार
## मुलगी गर्भवती; वडिलांस अटक

**लातूर/प्रतिनिधी :** जळकोट तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिला गर्भवती केल्याप्रकरणी जळकोट पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांच्या तपासादरम्यान, पिताच आरोपी असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी वडिलांस रविवारी दुपारी अटक केली आहे.

पोलिसांनी सांगितले, तालुक्यातील माळहिप्परगा येथील एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञाताने अत्याचार करुन गर्भवती केल्याची तक्रार पिडित मुलीच्या आईने जळकोट पोलिसांत १७ एप्रिल रोजी दिली होती. त्यावरुन जळकोट पोलिसांत अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

उपविभागीय पोलिस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली जळकोटचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड व




त्यांच्या सहकाऱ्यांनी या प्रकरणाचा तपास गतिमान पध्दतीने केला. तेव्हा संशयाची सुई घरातच फिरू लागल्याने पोलिसांनी मुलीच्या वडिलांना ताब्यात घेतले. दरम्यान, सरकारी रुग्णालयात मुलीची तपासणी झाली असता ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी रविवारी आरोपी पित्यास अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीस दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## ब्लॅकस्पॉटवर पोलिसांची लक्षवेधी जनजागृती; अपघातग्रस्त कार हायवेवर टांगली

**औसा /प्रतिनिधी :** वेग आणि वाहतूक नियमांच्या उल्लंघनामुळे होणारे भीषण अपघात रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून औसा पोलिसांनी एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. ६ मार्च रोजी रात्री औसा-तुळजापूर महामार्गावर एका भरधाव बीएमडब्ल्यू कारचा भीषण अपघात होऊन चौघांचा जागीच मृत्यू झाला होता. या अपघातात सीटबेल्टचा वापर न केल्यामुळे चौघांना आपला जीव गमवावा लागला, हे तपासात समोर आले होते.

**अपघाताची कार बनली 'इशारा'**

हाच जीवघेणा निष्काळजीपणा वाहनधारकांच्या नजरेत भरण्यासाठी पोलिसांनी तीच अपघातग्रस्त कार चार लोखंडी खांबांच्या सहाय्याने महामार्गालगत हवेत टांगली आहे. शेजारीच लावलेल्या माहिती फलकावर सीटबेल्ट नाही वापरला म्हणून चौघांचा जीव गेला असा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. हा दृश्यात्मक संदेश पाहून महामार्गावरून ये-जा करणारे वाहनधारक सावध होत असून अनेकांकडून वेगावर नियंत्रण मिळवले जात असल्याचे चित्र दिसत आहे.




**ब्लॅकस्पॉटवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न**

औसा एमआयडीसी ते वानवडा मोड हा भाग 'ब्लॅकस्पॉट' म्हणून ओळखला जातो, जिथे आतापर्यंत ५० पेक्षा अधिकजणांचा अपघातात मृत्यू झाला आहे. मात्र, पोलिसांच्या या नाविन्यपूर्ण जनजागृतीनंतर या भागातील अपघातांचे प्रमाण काही प्रमाणात घटले असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

**अती वेग टाळा**

जीवन अनमोल आहे. एक छोटीशी चूक संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त करू शकते. अती वेग टाळा आणि सीटबेल्टचा वापर करा. वाहतूक नियमांचे पालन करणे हीच काळाची गरज आहे.

**– रेवन डमाले, पोलीस निरीक्षक, औसा.**




लातूर: छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील रस्ते सुरक्षेचा संदेश देण्यासाठी शहरात उभारण्यात आलेला एक अनोखा देखावा. अपघात झालेली दुचाकी आणि त्यामागे रस्ते सुरक्षेचे नियम सांगणारा फलक वाहनचालकांचे लक्ष वेधून घेत आहे. केवळ फलक वाचून नव्हे, तर या दुचाकीची अवस्था पाहून तरी वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवावे, असा उद्देश यातून दिसून येतो.

### वेगळे वळण.....

अनुचित घटना घडे
वेगळे लागते वळण
बघ्यांची लोटते गर्दी
फोटो पोस्ट उधळण
असेझाले तसे झाले
दळांया लागा दळण
उंचावूनि पाहे भुवया
भितीआश्चर्ये गाळण
बेताल वक्तव्ये बोला
मनाची करते चाळण
अफवा आग धुमसते
नाठाळ पुरवी जळण
कोलमडू पडे यंत्रणा
व्यवस्था घेई लोळण
अडचणी तपासकार्ये
शिस्तकठीण पाळण
पीडीत धैर्य संयमाचे
करुन टाके उन्मळण
रस भरीत एक वर्णन
तीचं आळव गवळण
प्रसिद्धी फिरतेमुक्तते
राजकारण घोटाळण
करता मदती प्रदर्शन
चाले श्रेया लोटाळण
काळ खरे स्वयंसेवक
घाली दुःखा आवरण
सर्वोत्तम मार्ग एकचि
स्वतास्वतांस सावरणं

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

### प्रभात किरणे

दुसऱ्याचा पैसा,स्वतःचा उदो उदो
आश्रय झाडाचा,बांडगुळाच राज
कष्टाविना घेती श्रेय,नसते लाज
नसे कुठे मान,तरी न सुटे खाज
-इंजि. नागनाथ कलवले लातूर
९७६४७ ८८२८८


### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यात पेट्रोल डिझेलची टंचाई ?...

### चिमटा दयाचा



छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ ट्रॉफिकला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला!
रस्त्यात अडथळा निर्माण केला !!
रस्तावरच अतिक्रमण असल्याने शिस्त कशी लागणार!!!


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## डिजीटल बरोबर राष्ट्रीय विचाराचे शिक्षण असावे

शिक्षणात वाढते बदल होत आहेत ही एक समाधानाची बाब आहे. आजकाल शिक्षण क्षेत्रात 'डिजिटल क्रांती'बद्दल बोलणे एक प्रकारे फॅशन झाले आहे. स्मार्ट क्लासरूम, ऑनलाइन कोर्सेस आणि हाय-टेक उपकरणे यांची जाहिरातींमध्ये मांडणी करून चमकदार शिक्षणाचे एक आकर्षक चित्र निर्माण केले जात आहे. पहिल्या नजरेत हे प्रगतीसारखे वाटू शकते, पण या चमकदारपणामागे प्रशासनाची दुर्गम भागात, ग्रामीण भागात पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष आणि उदासीनता लपलेली आहे ज्यावर आता स्पष्टपणे चर्चा होणे गरजेचे आहे. प्रत्येक शाळा किंवा महाविद्यालयात 'स्मार्ट बोर्ड' बसवले की शिक्षणाची गुणवत्ता आपोआप वाढते/ सुधारते, असा एक गैरसमज मोठ्या प्रमाणावर पसरलेला आहे. तंत्रज्ञान हे शिक्षणाचे फक्त एक साधन आहे, अंतिम उद्दिष्ट नाही. ऑनलाइन शिक्षणाच्या नावाखाली फक्त व्हिडिओज् दाखवणे म्हणजे खरे शिक्षण होत नाही. कौशल्याधारित शिक्षणाचा जोरदार प्रचार होत असला तरी आपल्या देशातील लाखो पदवीधरांकडे अजूनही मूलभूत रोजगारक्षम कौशल्यांचा अभाव आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा शिक्का मारताना आपण विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाकडे दुर्लक्ष करत आहोत, असे वाटते. तंत्रज्ञानाचा अतिरेक होत आहे. सरकार 'डिजिटल इंडिया' आणि 'पीएम ई-विद्या' सारख्या योजना जाहीर करते मात्र ह्या कागदावर या योजना प्रभावी दिसतात; पण प्रत्यक्षात दुर्गम भागातील, ग्रामीण भागातील हजारो शाळांमध्ये अजूनही वीज नाही, इंटरनेट किंवा टॅबलेट तर दूरची गोष्ट आहे. कोविड काळात या 'डिजिटल क्रांती'ने श्रीमंत आणि गरीब यांच्यात मोठी दरी निर्माण केली. जर फक्त पैशांनी श्रीमंत लोकांनाच दर्जेदार डिजिटल शिक्षण मिळत असेल, तर ही क्रांती नेमकी कोणासाठी आहे? सरकार फक्त योजनांची नावे बदलण्यात समाधानी आहे का, की खरोखरच शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवत आहे? आता याबाबत कोणाची जबाबदारी याबाबत चर्चा होणे आवश्यक आहे. या तंत्रज्ञानाच्या सोयीसुविधांचा उपयोग फक्त शहरी विभागातील विद्यार्थ्यांना होतो. ग्रामीण, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना होत नाही. ही वस्तुस्थिती आहे. ग्रामीण भागात, दुर्गम भागात सरकारी अनुदानित शाळांमध्ये/ महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे, सर्वांनाच माहिती आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे व समाजाचे भरपूर नुकसान होत आहे. शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये ठराविक संस्थांना प्राधान्य दिल्याचे विदारक चित्र दिसत आहे. यामुळे जनआक्रोश निर्माण झाला आहे. मोठ्या शैक्षणिक संस्था आणि आंतरराष्ट्रीय संघटना जसे की यूनेस्को आणि यूनिसेफ शिक्षण प्रसारासाठी काम करत असल्याचा दावा करतात. मात्र प्रत्यक्षात अनेक खासगी संस्थांनी या डिजिटल क्रांतीला व्यवसायाचे/ व्यापाराचे स्वरूप दिले आहे. तंत्रज्ञानाच्या नावाखाली पालकांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे घेतले जात आहेत. सरकारी शिष्यवृत्तीद्वारे कोट्यवधी रुपये खर्च केले जात असले तरी, भ्रष्टाचार आणि तांत्रिक अडचणींमुळे ही मदत गरजू विद्यार्थ्यांपर्यंत वेळेवर पोहोचत नाही. फक्त शिष्यवृत्ती पोर्टल सुरू करणे पुरेसे नाही; त्यामध्ये पारदर्शकता आणि वेग हे दोन्ही सुनिश्चित करणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांपर्यंत पोचणे जरुरीचे आहे. शिक्षणातील डिजिटल क्रांती ही काळाची गरज आहे, पण ती केवळ कागदावरच राहू नये. सरकारने फक्त घोषणाबाजी थांबवून मूलभूत पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केली आणि खासगी संस्थांच्या नफेखोरीवर नियंत्रण आणले, तरच ही क्रांती यशस्वी ठरेल. अन्यथा ती फक्त ते एक डिजिटल मृगजळ ठरेल. शिक्षण 'अद्ययावत' बनवायचे असेल, तर सर्वप्रथम योग्य धोरणे आणि त्यांची अंमलबजावणी उत्कृष्टपणे करणे गरजेचे आहे. सरकारी धोरणांमध्ये अनेकदा दूरदृष्टी असते, पण अंमलबजावणीचा अभाव दिसतो. 'नॅशनल डिजिटल एज्युकेशन आर्किटेक्चर'सारख्या उपक्रमांनी ग्रामीण गरिबांच्या समस्या बाजूला ठेवल्या आहेत. यूनेस्को सारख्या संस्था जागतिक अहवाल प्रसिद्ध करण्यात अभिमान बाळगतात, पण दुर्गम भागातील, ग्रामीण भागातील 'डिजिटल अंधार' दूर करण्यासाठी ठोस कृती आराखडा आखाताना दिसत नाही. गुंतागुंतीच्या शिष्यवृत्ती प्रक्रिया आणि तांत्रिक अडचणींमुळे अनेक गरीब विद्यार्थी शालेय/उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत. जोपर्यंत सरकार आणि संस्था आकडेवारीचा खेळ थांबवून गरीब विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष समस्यांचे निराकरण करत नाहीत, तोपर्यंत ही क्रांती वास्तवात येणार नाही, असे वाटते. ही क्रांती कागदावरच राहील, अशी भीती आहे. शिक्षण ही काळाची गरज आहे. शिक्षण सर्वांना सर्वसमावेश असले पाहिजे. ते आपल्या देशात दिसून येत नाही. शिक्षणाचे बाजारीकरण झाल्याने शिक्षण सम्राट निर्माण झाले आहेत. काही झाले तरी शिक्षण वाड्या, तांड्या पासून मोठ्या शहरापर्यंत पोंहचले पाहिजेत. डिजीटन क्रांती बरोबर मायबोलीची गरज आहे. मातृभाषेंची गरज आहे. डिजीटलच्या अगोदर इतर देशात जसे अतिवेगवान इंटरनेटची सुविधा असली पाहिजे. आपल्या देशात बँकेत जावा किंवा पोष्टात केवळ नेट स्लो किंवा बंद असल्याने ग्राहक तासनतास बसून राहातात. यावर काही तोडगा काढला जात नाही. शहरात डिजीटल शिक्षण यशस्वी होवू शकते मात्र ग्रामीण भागात अजूनही नेट येत नाही तर शिक्षण कसे घेणार? केवळ डिजिटल म्हणून वेगळेच चित्र रंगविण्यापेक्षा आहे त्या शिक्षण पद्धतीत सुधारणा आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणाऱ्या शिक्षणाची मोठी गरज आहे. शिक्षण व शिकविणारी मंडळी ही राष्ट्रीय विचाराने प्रेरीत असल्याने देशाभिमानी पिढी निर्माण झाली होते हे कदापी विसरून चालणार नाही.

# 'टेक-वारी २.०' च्या माध्यमातून महाराष्ट्राची भविष्यातील गतिमान प्रशासनाकडे वाटचाल




मंत्रालयात येत्या ४ ते ८ मे २०२६ या कालावधीत 'टेक-वारी २.०' अंतर्गत 'महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. खासगी क्षेत्र, शासन आणि नागरी समाज यामधील तंत्रज्ञ, धोरणकर्ते, कलाकार, आरोग्य-कल्याण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विविध विषयांचे तज्ज्ञ या वारीत प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या प्रशिक्षणात ६ हजार कर्मचारी प्रत्यक्ष सहभागी होत आहेत. राज्यातील कोणताही शासकीय अधिकारी आणि कर्मचारी या प्रशिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी राज्यभरातील नऊ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक सत्राचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. शासकीय अधिकारी-कर्मचारी यांची गुणवत्ता, कामातील दर्जा वाढविण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणाला विशेष महत्व आहे.

**एका आठवड्यात ३५ लाख तासांचे प्रशिक्षण**

एप्रिल २०२६ मध्ये, २ ते १० एप्रिल दरम्यान आयोजित केलेल्या 'महा-साधना सप्ताह' या राज्यव्यापी प्रशिक्षण मोहिमेअंतर्गत, ८.८ लाखांहून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांनी 'ळऋञढ कर्मयोगी' प्लॅटफॉर्मवर किमान ४ तासांचे संरचित प्रशिक्षण पूर्ण केले. यामध्ये 'सार्वजनिक प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता', 'सायबर सुरक्षेची मूलतत्त्वे', आयआयएम बंगळूरुद्वारे 'सार्वजनिक धोरणाची मूलतत्वे' आणि आयआयएम अहमदाबादद्वारे 'रणनीती व गेम थिअरी' या अभ्यासक्रमांची यादी नियोजनपूर्वक तयार करण्यात आली होती. या ७ दिवसांत, महाराष्ट्राच्या सरकारी कर्मचाऱ्यांनी तब्बल ३५ लाख तासांचे सखोल प्रशिक्षण पूर्ण केले. याची नोंद एका थेट डॅशबोर्डवर रिअल-टाइममध्ये नोंदविण्यात आली आणि क्षमता निर्माण आयोगाद्वारे (सीबीसी) सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली.

**जागतिक आव्हानाला प्रतिसाद**

वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचारी वर्गाला कसे तयार करायचे, हे आजचे प्रमुख आव्हान आहे. ते केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. जगभरात यासाठी विविध उपाय राबवले जात आहेत. सिंगापूर आपल्या 'स्किल्सफ्युचर' मोहिमेद्वारे कौशल्यविकासावर भर देत आहे, तर संयुक्त अरब अमिराती संघीय संस्थांमध्ये मुख्य एआय अधिकाऱ्यांची नियुक्ती करत आहे. एस्टोनिया 'डिजिटल स्टेट अकॅडमी' राबवत आहे. या सर्व प्रयत्नांमागे एकच प्रश्न आहे, वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगासाठी मोठ्या सरकारी कर्मचारी वर्गाला कसे तयार करायचे? युनेस्कोने २०२५ मध्ये नमूद केले की, जगातील निम्म्याहून कमी देशांनी त्यांच्या ई-गव्हर्नमेंट धोरणांमध्ये एआयचा समावेश केला आहे. त्यामुळे जग अजूनही या क्षेत्रात मार्ग शोधत आहे आणि महाराष्ट्रही आपल्या परिस्थितीप्रमाणे या दिशेने वाटचाल करत आहे.

**..म्हणून 'टेक-वारी' उपक्रम आवश्यक**

शासनातील तंत्रज्ञान आता केवळ बॅक-ऑफिसपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते फ्रंट ऑफिसचा भाग बनले आहे. 'डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण अधिनियम, २०२३' नुसार प्रत्येक विभागाला डेटा विश्वस्त म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते. डिजिलॉकर, उमंग, आधार आणि इंडिया स्टॅक यांसारख्या प्लॅटफॉर्ममुळे नागरिक-शासन संवादात मोठे परिवर्तन घडले आहे. एआय च्या वापराने तक्रार निवारण, अनुपालन देखरेख आणि सेवा वितरणाच्या पद्धतीत बदल घडत आहे, तर उदयोन्मुख क्वांटम कॉम्प्युटिंग येत्या काही वर्षांत सध्याच्या सायबर सुरक्षा प्रणालींसमोर नवे आव्हान उभे करू शकते. या बदलांची माहिती नसल्यास अधिकारी कामात मागे पडू शकतात. मात्र यात त्यांचा दोष नाही, कारण तंत्रज्ञान खूप वेगाने बदलत आहे. हीच दरी भरून काढण्यासाठी 'टेक-वारी' उपक्रम राबवला जात आहे.

**तज्ज्ञांच्या सत्रांमधून कर्मचाऱ्यांना आधुनिक जगाची माहिती होणार**

'टेक-वारी २.०'चे वैशिष्ट्य म्हणजे हे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवणे. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात मंत्रालयात डिजिटल गव्हर्नन्स, डीपीडीपी कायदा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, क्वांटम कॉम्प्युटिंग, जनरेटिव्ह एआयचा प्रत्यक्ष अनुभव, सायबर सुरक्षा, प्रशासनातील नीतिमत्ता तसेच केंद्र सरकारच्या प्लॅटफॉर्म्स या विषयांवर तज्ज्ञांची सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. या कार्यक्रमात 'डिजिटल पेमेंट्स'विषयी 'एनपीसीआय'चे सीईओ, 'क्वांटम कॉम्प्युटिंग'विषयी आयबीएमचे सीटीओ तसेच 'एआय'विषयी 'नॅसकॉम'चे फ्रंटियर टेक्नॉलॉजी संचालक मार्गदर्शन करणार आहेत. यासोबतच संवाद, नेतृत्व आणि प्रशासकीय नीतिमत्ता या विषयांवरही सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. कर्मचारी विकासाला प्राधान्य देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्वतः तंत्रज्ञ असलेले मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात येत असून, तो राज्याच्या प्राधान्यक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन**

'टेक-वारी २.०' मागील संकल्पना केवळ तांत्रिक शिक्षणापुरती मर्यादित नाही. या पाच दिवसांत पाच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'तालरंग', 'नादरंग', 'योगरंग', 'कलारंग' आणि 'संस्कृतीरंग' असे पाच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तालरंगाद्वारे ढोलकीच्या माध्यमातून संघभावना वृद्धिंगत केली जाते, नादरंगातून संगीताच्या माध्यमातून तणावमुक्तीवर भर दिला जातो, तर योगरंगातून मन आणि शरीराच्या संतुलनावर लक्ष केंद्रित केले जाते. कलारंगामध्ये कला, एआय आणि प्रशासन यांतील संबंधांचा वेध घेतला जातो. तसेच, संस्कृतीरंगाद्वारे महाराष्ट्राच्या वारी परंपरेचे प्रतीकात्मक दर्शन घडवण्यात येते.

केवळ नियमांचे पालन करणारा प्रशिक्षित अधिकारी निर्माण करण्यापेक्षा, मानसिकदृष्ट्या सक्षम, सांस्कृतिकदृष्ट्या दृढ आणि व्यावसायिकदृष्ट्या आत्मविश्वासू असलेला सरकारी अधिकारी नागरिकांची अधिक चांगली सेवा करेल, या विश्वासावर या कार्यक्रमाची रचना आधारलेली आहे. तसेच, प्रगती ही मूल्यांवर आधारित असावी, यावरही या उपक्रमात भर देण्यात आला आहे.

**वारकऱ्यांप्रमाणे चालत राहणारी प्रक्रिया**

'महा-साधना सप्ताह'दरम्यान नोंदवलेले ३५ लाख तासांचे प्रशिक्षण ही केवळ आकडेवारी नसून, त्यातून भविष्यात अधिक चांगले निर्णय, तक्रारींचे जलद निवारण आणि नागरिकांना अधिक सुलभ सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या दिशेने अजूनही अनेक पावले उचलणे बाकी आहे. इतर राज्ये आणि देश या प्रवासाच्या काही टप्प्यांवर आपल्यापेक्षा पुढे आहेत आणि त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप काही आहे.

राज्याची दिशा स्पष्ट असून या उपक्रमाला गती मिळत असून त्यातून बांधिलकी जपली जात आहे. ज्याप्रमाणे वारकरी चालत राहतो, त्याच्या प्रवासासारखीच ही टप्प्याटप्प्याने पुढे जाणारी प्रक्रिया आहे. राज्याचा कर्मचारी वर्ग वारकऱ्यांप्रमाणेच या शिक्षण प्रवासात सहभागी होत आहे. शेवटी सांगायचं म्हणजे 'टेक-वारी २.०' हा शेवट नसून प्रशासनाच्या या शिकण्याच्या प्रवासातील पुढचा टप्पा मानला जात आहे.

**- व्ही. राधा, (भा.प्र.से.)**
**अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा)**

# प्रामाणिकपणा, सेवा आणि समर्पण जपण्याची गरज - राज्यपाल जिष्णु देव वर्मा राज्यपालांच्या हस्ते 'न्यूजमेकर्स अचिव्हर्स अवॉर्ड्स २०२६'चे वितरण



**मुंबई/प्रतिनिधी** : समाजासमोर असलेल्या विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर प्रामाणिकपणा, सेवा आणि समर्पण या मूल्यांचे जतन करण्याची गरज असून पुरस्कार विजेते हे या मूल्यांचे जिवंत उदाहरण आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

'आफ्टरनून व्हॉइस'तर्फे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित १८ व्या न्यूजमेकर्स अचिव्हर्स अवॉर्ड्स २०२६ कार्यक्रमात राज्यपाल श्री.वर्मा बोलत होते. यावेळी संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्ष पद्मश्री डॉ.संध्या पुरेचा, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, ऑफ्टरनून व्हाईसच्या मुख्य संपादक डॉ.वैदेही तमन तसेच पुरस्कारप्राप्त मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्यपालांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा देत उपस्थितांचे स्वागत केले. समाजातील लोकसेवा, कला-संस्कृती, पत्रकारिता, सामाजिक कार्य, शिक्षण आणि नवोन्मेष अशा विविध क्षेत्रांतील योगदानामुळे समाज समृद्ध होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यपाल श्री. वर्मा यांनी समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करणारे १८ वे न्यूज मेकर्स अचिव्हर्स अवॉर्ड्स २०२६ हे व्यासपीठ समाजात उच्च आदर्श, जबाबदारी आणि राष्ट्रनिर्मितीची भावना दृढ करणारे असल्याचे सांगितले.

यावेळी जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार रमेश पतंगे, राही भिडे, गायक हरिहरन, अभिनेत्री सुषमा देशपांडे, समाजसेवक दत्ता बारगाजे आणि अभिनेत्री झीनत अमान यांचे राज्यपालांनी विशेष अभिनंदन केले. तसेच २०२६ मधील सर्व न्यूजमेकर अचिव्हर्स पुरस्कार विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

संगीताच्या माध्यमातून भारतीय संस्कृती समृद्ध करणाऱ्या हरिहरन यांचे योगदान उल्लेखनीय असल्याचे सांगताना, माहिती अधिकाराद्वारे पारदर्शकता वाढविणाऱ्या विजय कुंभार यांच्या कार्याचेही त्यांनी कौतुक केले. तसेच योगेंद्र बांगर यांच्या 'आजीबाईची शाळा' या उपक्रमाचा उल्लेख करत शिक्षण कोणत्याही वयात व्यक्तीला सक्षम बनवू शकते, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राची परंपरा प्रगतिशील विचार, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक समृद्धीची असल्याचे अधोरेखित करत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. आजही महाराष्ट्र उद्योग, प्रशासन आणि सामाजिक विकासात देशाचे नेतृत्व करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते गायिका उषा मंगेशकर, पद्मश्री गायक हरिहरन, पद्मश्री शेफ संजीव कपूर, अभिनेत्री सुषमा देशपांडे, पत्रकार राही भिडे आणि समाजसेवक दत्ता बारगजे यांचा प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## नाश्त्याला हॉटेलसारखे मऊ आणि चविष्ट 'इंदोरी पोहे' कसे बनवायचे?




सकाळचा नाश्ता हा दिवसाची सर्वात महत्त्वाची सुरुवात असते. जर सकाळी काहीतरी आरोग्यदायी, चविष्ट आणि झटपट तयार होणारे खायला मिळाले, तर पूर्ण दिवस उत्साहात जातो. अशावेळी 'इंदोरी पोहे' हा एक उत्तम पर्याय ठरतो. आपल्या खास चवीसाठी प्रसिद्ध असलेले हे पोहे कांदा, हिरवी मिरची, शेंगदाणे, इंदोरी शेव आणि डाळिंबाच्या दाण्यांनी सजवला जातो. हलका असल्याने तो पचायला सोपा असतो आणि बराच वेळ पोट भरलेले ठेवतो.

**आवश्यक साहित्य:**

पोहे: २ कप जाड पोहे

भाज्या: १ मध्यम कांदा (बारीक चिरलेला), हिरव्या मिरच्या, कढीपत्ता

फोडणीसाठी: २ चमचे तेल, अर्धा चमचा मोहरी, बडीशेप, हळद

चवीसाठी: जिरावन मसाला, १ चमचा साखर, मीठ, लिंबाचा रस

सजावटीसाठी: तळलेले शेंगदाणे, कोथिंबीर, इंदोरी शेव आणि डाळिंबाचे दाणे

**इंदोरी पोहे झटपट कसं बनवायच?**

१. सर्वप्रथम पोहे एका चाळणीत घेऊन स्वच्छ पाण्याने हलक्या हाताने धुवून घ्या. लक्षात ठेवा, पोहे पाण्यात भिजवून ठेवू नका, फक्त ओले करा. त्यात मीठ आणि १ चमचा साखर मिसळून १०-१५ मिनिटे बाजूला ठेवा. यामुळे पोहे छान सुटसुटीत होतात.

२. कढईत २ चमचे तेल गरम करा. त्यात अर्धा कप शेंगदाणे सोनेरी होईपर्यंत तळून एका प्लेटमध्ये काढून घ्या.

३. त्याच उरलेल्या तेलात मोहरी, बडीशेप आणि कढीपत्ता टाका. मोहरी तडतडली की त्यात बारीक चिरलेला कांदा आणि हिरवी मिरची घालून कांदा पारदर्शक होईपर्यंत परता. त्यानंतर अर्धा चमचा हळद घाला.

४. आता भिजवलेले पोहे कढईत घालून हलक्या हाताने मिक्स करा. कढईवर झाकण ठेवून २-३ मिनिटे मंद आचेवर वाफ येऊ द्या.

५. गॅस बंद करून वरून लिंबाचा रस आणि कोथिंबीर टाका. पोहे प्लेटमध्ये काढल्यानंतर त्यावर तळलेले शेंगदाणे, जिरावन मसाला, कुरकुरीत इंदोरी शेव आणि डाळिंबाचे दाणे घालून गरमागरम सर्व्ह करा.

## शाकाहारी लोकांसाठी अंड्याशिवाय खास 'व्हेज ऑम्लेट'



ऑम्लेट म्हटलं की, सर्वात आधी डोळ्यांसमोर अंडे येते. कारण साधारणपणे अंड्यापासूनच ऑम्लेट तयार केले जाते. पण अंड्याशिवायही ऑम्लेट बनवता येते. हो, तुम्ही अगदी बरोबर वाचलं. आज आम्ही तुम्हाला प्रोटीन आणि पोषणाने भरपूर अशा ऑम्लेटबद्दल सांगत आहोत, ज्याचा शाकाहारी लोक आनंदाने आस्वाद घेऊ शकतात. रेसिपी जाणून घ्या.

**अंड्याशिवाय ऑम्लेट कसे बनवायचे?**

**साहित्य:** बेसन किंवा सोया बॅटर (पीठ), पनीर, कांदा, ढोबळी मिरची (शिमला मिर्च), टोमॅटो, हिरवी मिरची, कोथिंबीर, मीठ, लाल तिखट, हळद, ओवा, तेल.

कृती :

१. हे ऑम्लेट बनवण्यासाठी सर्वप्रथम एका बाऊलमध्ये बेसन घ्या.

२. जर तुम्हाला बेसनाऐवजी सोया वापरून ऑम्लेट बनवायचे असेल, तर भिजवलेले सोया चंक्स मिक्सरला लावून त्याचे पीठ तयार करा.

३. आता यामध्ये मीठ, ओवा, पनीर, बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, हिरवी मिरची, कोथिंबीर, हळद आणि लाल तिखट घालून नीट मिक्स करा.

४. तुम्हाला आवडत असल्यास तुम्ही इतर भाज्याही यामध्ये घालू शकता.

५. आता एक पॅन गरम करा, त्यावर हे पीठ टाकून व्यवस्थित पसरवा. कडेने थोडे तेल किंवा तूप सोडा.

६. जेव्हा एका बाजूने ऑम्लेट व्यवस्थित शिजेल, तेव्हा ते उलटून दुसऱ्या बाजूनेही नीट भाजून घ्या.

७. तुमचे 'वेज ऑम्लेट' तयार आहे! हे तुम्ही चटणी किंवा सॉससोबत खाऊ शकता.

**बेसनाचे फायदे**

बेसन हे हरभऱ्याच्या डाळीपासून तयार केले जाते. हे प्रथिनांचा एक उत्तम स्रोत मानले जाते. यात केवळ प्रथिनेच नाहीत, तर डायटरी फायबर, जीवनसत्त्वे, लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम, झिंक आणि तांबे यांसारखे अनेक पोषक घटक आढळतात, जे शरीराला फायदेशीर ठरतात. तुम्ही याचा आहारात विविध प्रकारे समावेश करू शकता. पचनासाठी देखील बेसन अतिशय उत्तम मानले जाते.

## आरोग्यासाठी मोरिंगा अद्भुत फायदे

**मोरिंगाच्या पानांचे लोणचं नियमितपणे खाण्याचे अनेक फायदे आहेत**

**हाडे मजबूत होतात:** मोरिंगाच्या पानांमध्ये दुधापेक्षा अधिक कॅल्शियम असते. हे लोणचं खाल्ल्याने हाडांची घनता वाढते आणि हाडे अधिक मजबूत होतात. सांधेदुखीच्या रुग्णांसाठी हे खूप फायदेशीर आहे.

**इम्युनिटी बूस्टर:** व्हिटॅमिन 'सी' आणि 'ऐ' मुबलक असल्याने, मोरिंगाचे लोणचं रोगप्रतिकारशक्ती (खार्पिळीं) वाढवते. यामुळे सर्दी, खोकला आणि संसर्गजन्य रोगांपासून बचाव होतो.

**पचनक्रिया सुधारते:** लोणच्यामध्ये अँटी-ऑक्सिडंट्स आणि फायबर असल्यामुळे पचन सुधारते. तसेच, यात असलेले अँटीबॅक्टेरियल गुणधर्म पोटातील संसर्गापासून बचाव करतात आणि शरीर डिटॉक्स करण्यास मदत करतात.

**ॲनिमियावर रामबाण:** मोरिंगाच्या पानांमध्ये लोह (खीप) मोठ्या प्रमाणात असते. नियमित सेवनाने रक्ताची कमतरता (निमिया) दूर होण्यास मदत मिळते.

**पोषक तत्वांचा उत्तम स्रोत:** मोरिंगाला 'सुपरफूड' असेच म्हटले जाते. या लोणच्यामुळे शरीराला आवश्यक असलेले व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि प्रथिने सहज मिळतात.

दोन-तृतीयांश बहुमताच्या आधारावर एखाद्या पक्षाच्या गटाला दुसऱ्या पक्षात विलीन होण्याची परवानगी देण्याची तरतूद राजकीय स्थैर्य राखण्यासाठी होती. प्रत्यक्षात मात्र ती ङ्गघाऊक पक्षांतरफ वैध करण्याचे साधन बनली. वैयक्तिक स्तरावर पक्ष बदलणार्या सदस्याला अपात्र ठरवले जाते; पण मोठ्या गटाने असे केल्यास कायदेशीर संरक्षण मिळते, हा विरोधाभास लोकशाहीच्या मूलभूत तत्वांना आव्हान देत आहे.
आम आदमी पक्षाच्या राज्य सभेतील सात खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या खासदारांना अपात्र ठरवण्याची मागणी ङ्गआपफ्चे राज्यसभेतील नेते संजय सिंह यांनी केली होती.फुटिर गटाचे नेते राघव चड्ढा यांनी घटनेच्या दहाव्या अनुसूचीनुसार दोन-तृतीयांश सदस्यांच्या विलीनीकरणाला पक्षांतरबंदी कायदा लागू होत नाही, असा युक्तिवाद केला. सभापतींच्या मंजुरीनंतर हे सदस्य कायदेशीरदृष्टया सुरक्षित झाले असले, तरी या प्रक्रियेची नैतिक बाजू मात्र अजूनही प्रश्नांकित आहे.
पक्षांतरांचा हा खेळ नवीन नाही. १९६७ मध्ये गयालाल यांनी एका पंधरवड्यात तीन वेळा पक्ष बदलून ङ्गआयाराम-गयारामम संस्कृतीची सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर राजीव गांधी यांच्या सरकारने ५२ व्या घटनादुरुस्तीमधून दहावी अनुसूची लागू केली. सुरुवातीला एक-तृतीयांश सदस्यांच्या गटाला अपात्रतेतून सूट होती; पण २००३ च्या ९१ व्या दुरुस्तीने हा आकडा दोन-तृतीयांश करण्यात आला. म्हणजेच, कायद्यानेच सामूहिक पक्षांतर वैध ठरवण्याचा मार्ग खुला केला. यामुळे एक विचित्र विरोधाभास निर्माण झाला आहे. व्यक्तिगत पक्षांतर हा गुन्हा; पण मोठ्या संख्येने केलेले पक्षांतर कायदेशीर!अशी स्थिती त्यामुळे निर्माण झाली. हा कायद्याचा तांत्रिक भाग असला, तरी लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांपुढे प्रश्नचिन्ह उभे करतो. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयांमध्येही ङ्गघटनात्मक नैतिकतेफ्चा उल्लेख केला आहे.
पक्षांतर ही अनेकदा केंद्रीकृत आणि लोकशाही विरोधी व्यवस्थेची परिणती असते. पक्षांतर्गत संवाद, निवडणुका आणि पारदर्शकता वाढवली, तर असंतोष व्यक्त करण्यासाठी वैध मार्ग उपलब्ध होईल आणि पक्षांतराची गरज



# आता लोकशाही मूल्यांनाच आव्हान

कमी होईल. पक्षांतरविरोधी कायदा मूळ उद्दिष्टापासून दूर जात असल्याचे स्पष्ट संकेत दिसत आहेत.
लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी बनवलेला हा कायदा राजकीय गणितांचे साधन बनत असेल, तर त्याचा पुनर्विचार करणे अपरिहार्य ठरते.
अनेक वेळा केवळ विधानमंडळातील एका पक्षाच्या दोन-तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दर्शवला, की तेच विलीनीकरण मानले जाते; परंतु मूळ राजकीय पक्षाचे संघटनात्मक पातळीवर कोणतेही विलिनीकरण झालेले नसते. त्यामुळे विचारसरणी, धोरणे किंवा जनतेचा कौल यापेक्षा आकड्यांचे गणित निर्णायक ठरते. या प्रक्रियेत कायद्याचा मूळ उद्देश, राजकीय स्थैर्य आणि नैतिकता दुय्यम ठरते. या कायद्याच्या अंमलबजावणीत समोर येणारा आणखी एक महत्वाचा प्रश्न म्हणजे अध्यक्ष किंवा सभापती यांची भूमिका. अपात्रतेचा अंतिम निर्णय देण्याचा अधिकार त्यांच्याकडे असतो . ते बहुतांश वेळा एखाद्या राजकीय पक्षाशी संबंधित असतात. त्यामुळे त्यांच्या निर्णयांवर निष्पक्षतेपेक्षा राजकीय विचारांचा प्रभाव पडू शकतो, ही शंका केवळ सैद्धांतिक नाही, तर अनेक प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष अनुभवली गेली आहे. परिणामी, निर्णय प्रक्रियेवरचा विश्वास डळमळीत होतो.
निर्णय प्रक्रियेतील अस्पष्टता हीदेखील तितकीच गंभीर समस्या आहे. विलिनीकरण खरोखर झाले आहे, की तो केवळ पक्षबदलाचा एक प्रकार आहे, हे ठरवताना अनेक तांत्रिक बाबींचा विचार करावा लागतो. या दरम्यान संबंधित सदस्यांची स्थिती अनिश्चित राहते. ते मूळ पक्षाचे सदस्य मानले जात असले, तरी प्रत्यक्षात दुसर्या पक्षाला पाठिंबा देत असतात. या द्वंद्वात्मक स्थितीमुळे लोकशाही प्रक्रियेतील पारदर्शकता कमी होते. याहूनही चिंताजनक बाब म्हणजे या प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे अपात्रतेचे अर्ज दीर्घकाळ रेंगाळत राहतात. अनेकदा असे दिसते, की संबंधित सदस्य कार्यकाळ पूर्ण करतात आणि त्यानंतरही निर्णय झालेलच नसतो. यामुळे कायद्याचा प्रभाव कमी होतो आणि न्यायाच्या तत्त्वालाच धक्का बसतो.
पक्षांतर बंदी कायद्याचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे प्रतिनिधींच्या अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर येणारी मर्यादा. पक्षादेशाच्या माध्यमातून सदस्यांवर कठोर बंधने घातली जातात. सामान्य विधेयकांवरही पक्षाच्या भूमिकेपासून विचलित होण्याची मुभा नसते. परिणामी, निवडून आलेल्या प्रतिनिधींची स्वतःच्या विवेकानुसार किंवा मतदारसंघाच्या हितानुसार निर्णय घेण्याची क्षमता मर्यादित होते. हे प्रतिनिधी लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांनाच बाधा आणणारे आहे. त्यामुळे प्रतिनिधींची निष्ठा मतदारांपासून दूर जाऊन पक्षनेतृत्वाकडे वळते. लोकांनी निवडून दिलेला प्रतिनिधी हा त्यांच्या हितासाठी काम करेल, ही अपेक्षा दुय्यम ठरते आणि पक्षनिष्ठा सर्वोच्च बनते. ही स्थिती लोकशाहीच्या आत्म्यालाच कमजोर करते. न्यायालयीन पातळीवरही पक्षांतर बंदी कायद्याबाबत स्पष्टता नाही.मुंबई उच्च न्यायालयाच्या एका निर्णयात दोन-तृतीयांश सदस्यांनी दुसर्या पक्षात प्रवेश केल्यास त्याला विलीनीकरण मानले जाऊ शकते, असे म्हटले गेले. मूळ पक्षाचे औपचारिक विलीनीकरण झाले नसले, तरी हे विलीनीकरण वैध मानण्याच्या निर्णयावर मोठ्या प्रमाणात टीका झाली आहे, कारण तो कायद्याच्या मूळ उद्देशालाच धक्का ठरतो. सर्वोच्च न्यायालयात या संदर्भातील प्रश्न अद्यापही निर्णायक स्वरूपात निकाली लागलेले नाहीत आणि त्यामुळे अनिश्चितता कायम आहे.
या सर्व मर्यादांच्या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम अपात्रतेचे निर्णय घेण्याची प्रक्रिया राजकीय प्रभावापासून दूर ठेवणे गरजेचे आहे. स्वतंत्र आणि निष्पक्ष अधिकरणाची स्थापना हा एक महत्त्वाचा उपाय ठरू शकतो. तसेच, निर्णयासाठी कालमर्यादा निश्चित करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे न्याय नाकारला जाणार नाही. पक्षादेशाच्या वापरावरही मर्यादा आणणे आवश्यक आहे. केवळ सरकारच्या अस्तित्वाशी संबंधित मुद्यांपुरताच पक्षादेश लागू करावा आणि इतर विषयांवर सदस्यांना स्वतंत्रपणे मतदान करण्याची मुभा द्यावी. यामुळे प्रतिनिधींची भूमिका अधिक प्रभावी आणि उत्तरदायी बनेल. विलीनीकरण या तरतुदीचा पुनर्विचार करणे हीदेखील काळाची गरज आहे. केवळ संख्याबळावर विलय मान्य न करता, मूळ पक्षाच्या संघटनात्मक स्तरावरील विलयही अनिवार्य ठरला पाहिजे. अन्यथा, हा मार्ग कायम गैरवापरासाठी खुला राहील.
कायद्याच्या दृष्टीने सभापतींचा निर्णय अंतिम मानला जातो; मात्र १९९२ नंतर न्यायालयीन फेरविचाराची दारे उघडली गेली. मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांमुळे विलीनीकरण आणि अपात्रता यांचे निकष अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. गोवा, उत्तर प्रदेश आणि शिवसेना आमदारांच्या पक्षसोडण्याच्या प्रकरणांनी हे स्पष्ट केले आहे, की केवळ आमदारांचा गट नव्हे, तर मूळ पक्षाची भूमिकादेखील महत्त्वाची ठरते. तरीही अंतिम निर्णय बहुतेक वेळा सत्ताधारी व्यवस्थेशी संबंधित पदाधिकार्यांकडेच राहतो. त्यामुळे निष्पक्षतेबाबत शंका निर्माण होते. यावर उपाय म्हणून स्वतंत्र न्यायाधिकरण स्थापन करण्याची शिफारस विधी आयोग आणि सर्वोच्च न्यायालयानेही केली आहे; पण ती अजूनही अमलात आ-लेली नाही.

**-भागा वरखडे**


# साबण,शाम्पू महागणार

## म्हणजेच गरिबांची आंघोळ आता विनासाबन, शॉम्पू

अर्थनगरीतून, महेश देशपांडे
व्यावसायिक गॅस आणि विमानाच्या इंधनाची किमान दोन वेळा दरवाढ झाली आहे.आता बिस्किट, साबण, शाम्पू महागणार असल्याची बातमी समोर आली आहे. दरम्यान, विमानांच्या इंधनातही इथेनॉल वापरण्याचा प्रयोग होणार आहे. याखेरीज इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढल्याचेही दिसून आले आहे.
भारतासमोर इंधनाच्या संकटानंतर खाद्यतेलाचा प्रश्नही गंभीर होत असल्याचे चित्र आहे. देशात पाम ऑईलचा तुटवडा वाढत आहे. भारत हा पाम ऑईल आयात करणारा जगातील सर्वात मोठा देश आहे. देशात दर वर्षी सुमारे ९.५ दशलक्ष टन पाम ऑईलचा वापर होतो, पण देशांतर्गत उत्पादन ४ लाख टनांपेक्षाही कमी आहे. त्यामुळे भारताला गरजेपैकी बहुतांश पाम ऑईल परदेशातून आयात करावे लागते. पाम ऑईल ताडाच्या झाडांपासून तयार केले जाते. या झाडांना मोठ्या प्रमाणात पाऊस आणि पाण्याची गरज असते.आग्नेय ( दक्षिण-पूर्व ) आशियात ताडाच्या झाडांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. भारत प्रामुख्याने इंडोनेशिया आणि मलेशिया येथून पाम ऑईल आयात करतो.
इंडोनेशियाने आपल्या देशात तयार होणारे पाम ऑईल निर्यातीऐवजी देशांतर्गत बायोडिझेल (बी ५०) निर्मितीसाठी वापरण्यास सुरुवात केली आहे. भारत आपल्या आयातीपैकी सुमारे ९० टक्क्यांहून अधिक पाम ऑईल आयात करतो. त्यातील जवळपास निम्मा हिस्सा इंडोनेशियाकडून येतो. या निर्णयामुळे जागतिक बाजारात दर वर्षी १५ ते २० लाख टन पाम ऑईलची कमतरता निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
पाम ऑईलचा वापर केवळ स्वयंपाकासाठी नव्हे, तर विविध औद्योगिक उत्पादनांमध्ये कच्चा माल म्हणूनही मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे त्याच्या तुटवड्याचा थेट परिणाम अनेक वस्तूंच्या किमतींवर होणार आहे. साबण आणि शॅम्पूमध्ये फेस निर्माण करण्यासाठी पाम ऑईलचा वापर केला जातो. तसेच लिपस्टिक, क्रीम-लोशन यांसारख्या सौंदर्यप्रसाधनांमध्येही पाम ऑईलचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. बिस्किटे आणि चिप्ससारख्या बेकरी आणि तळलेल्या पदार्थांमध्येही त्याचा मोठा वापर असल्याने पार्ले प्रॉडक्टस आणि ब्रिटानिया इंडस्ट्रिज यांच्या उत्पादनांच्या किमतीमध्येही वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.
विमानाच्या इंधनात इथेनॉल-केंद्र सरकारने 'एव्हिएशन टर्बाइन फ्युएल' (एटीएफ) मध्ये इथेनॉल मिसळण्यास मंजुरी दिली आहे. आता इथेनॉल व्यतिरिक्त इतर कृत्रिम किंवा मानवनिर्मित हायड्रोकार्बन्सदेखील 'एटीएफ' मध्ये मिसळले जाऊ शकतात. हा निर्णय अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत जारी केलेल्या 'एव्हिएशन टर्बाइन फ्युएल' (विपणन नियमन) आदेश २००१ मधील सुधारणांनंतर घेण्यात आला आहे. सरकारने अद्याप या नियमासाठी कोणतेही तात्काळ लक्ष्य निश्चित केलेले नाही. शिवाय या अधिसूचनेत कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नाही. विमाने सध्या केवळ पारंपरिक खनिज तेल वापरत आहेत. परंतु आता कृत्रिम इंधन मिसळल्याने त्यांचा खर्च कमी होईल. कारण परदेशातून आयात होणार्या महागड्या खनिज तेलावरील अवलंबित्व कमी करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. कच्च्या तेलाचा वापर कमी होईल, तेव्हा विमान कंपन्यांचा खर्च कमी होईल आणि विमानभाडे स्वस्त होईल. प्रदूषण कमी करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. या पावलामुळे भारत निव्वळ-शून्य उत्सर्जन साध्य करण्याच्या अधिक जवळ जाईल. विमानांमध्ये प्रदूषण कमी करणारे इंधन वापरले जाईल, तेव्हा आकाश स्वच्छ राहील.देशात तयार होणार्या एकूण स्मार्टफोन्सपैकी सुमारे २५ टक्के म्हणजेच प्रत्येक चारपैकी एक फोन आता देशी कंपन्यांकडून बनवला जात आहे. पूर्वी या क्षेत्रावर परदेशी कंपन्यांचे वर्चस्व होते; मात्र आता भारतीय उत्पादक कंपन्या हळूहळू आपली मजबूत पकड निर्माण करत आहेत. निर्यातीतील मोठी वाढ हे या वाढीमागील प्रमुख कारण मानले जात आहे. 'इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग सर्व्हिसेस' क्षेत्रात 'डिक्सॉन टेक्नॉलॉजीज' ही कंपनी १९ टक्के मार्केट शेअरसह अव्वल स्थानी पोह-ोचली आहे. कंपनीच्या उत्पादनात मोठी वाढ झाली असून मोटोरोला, रिअलमी आणि शाओमी यांसारख्या कंपन्यांकडून मिळालेल्या ऑर्डर्समुळे तिची प्रगती झाली आहे. फॉक्सकॉन ही कंपनी १६ टक्के शेअरसह दुसर्या क्रमांकावर आहे आणि 'ॲपल'साठी होणार्या निर्यातीमुळे तिचा फायदा झाला आहे. 'सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स'चा मार्केट शेअर काहीसा घसरला आहे. 'भगवती प्रॉडक्टस' या देशी कंपनीनेही नऊ टक्के शेअरसह पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवले आहे. विवो आणि ओपो यांसारख्या ब्रँड्सकडून मिळालेल्या कामामुळे कंपनीला वाढ मिळाली आहे. २०२५ मध्ये भारतातील स्मार्टफोन उत्पादनात आठ टक्के वाढ झाली, तर निर्यातीमध्ये २८ टक्क्यांची मोठी वाढ झाली; मात्र देशांतर्गत मागणी जवळपास स्थिर राहिली असून विक्रीमध्ये केवळ एक टक्क्याची वाढ झाली आहे. या वाढीमागे केंद्र सरकारची 'पीएलआय' योजना, परदेशी गुंतवणुकीवरील सवलती आणि कंपन्यांचे आउटसोर्सिंग धोरण हे महत्त्वाचे घटक आ-हेत. विशेषतः ओप्पो आणि विवो यांनी उत्पादन बाहेर देण्याचे धोरण स्वीकारल्याने देशी कंपन्यांना मोठ्या प्रमाणात काम मिळाले.
इलेक्ट्रिक वाहनांना मागणी पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतात इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) मागणीमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे इंधनाच्या उपलब्धतेबाबत आणि किमतीतील संभाव्य वाढीबाबत ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. त्यामुळे भारतीय ग्राहक आता पेट्रोल-डिझेल वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांना अधिक प्राधान्य देत आहेत. 'फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशन' (फाडा) ने दिलेल्या माहितीनुसार, नवीन मोटारींच्या विक्रीमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वाटा फेब्रुवारीतील ३.५ टक्क्यांवरून वाढून मार्चमध्ये ५.१ टक्क्यांवर पोहोचला आहे. 'टाटा मोटर्स'च्या प्रवासी वाहन विभागाचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा यांनी सांगितले, की गेल्या महिन्यात कंपनीच्या इलेक्ट्रिक कारच्या मागणीमध्ये सुमारे तीस टक्क्यांची वाढ झाली असून याला पश्चिम आशियातील परिस्थितीबाबतची चिंता कारणीभूत आहे. 'जेएसडबल्यू एमजी मोटर इंडिया'चे व्यवस्थापकीय संचालक अनुराग मेहरोत्रा यांनी सांगितले, की सध्या ग्राहक इलेक्ट्रिक वाहनांना पहिली पसंती देत आहेत. मार्च महिन्यात कंपनीने ग्राहकांच्या पसंतीमध्ये २६ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. 'वाहन' पोर्टलनुसार मार्च महिन्यात इलेक्ट्रिक कार नोंदणीमध्ये मोठी झेप घेतली असून ती मागील वर्षाच्या तुलनेत ६८ टक्क्यांनी वाढून २२ हजार ४९० युनिट्सपर्यंत पोहोचली आहे. वाढीचा हा कल अशा वेळी दिसून आला आहे, जेव्हा जागतिक बाजारात तेल आणि गॅसच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रिक वाहनांचा पर्याय ग्राहकांना अधिक सुरक्षित आणि किफायतशीर वाटत आहे. 'जेएसडबल्यू एमजी मोटर इंडिया कंपनी'ने आपल्या 'न्यू एनर्जी' वाहनांच्या पोर्टफोलिओचा विस्तार, उत्पादन क्षमता वाढवणे, स्थानिकीकरणाला चालना देणे आणि चार्जिंग सुविधांचा विकास करण्याची योजना आखली आहे. युरोप आणि अमेरिकेसारख्या बाजारपेठांमध्ये पेट्रोलच्या वाढत्या किमतीमुळे इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

'मुरुमं..' हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या कपाळावर आठ्या येतात. इंटरनेटवर 'ॲक्ने' अर्थात मुरमं, तारुण्यपिटिकांच्या समस्येबद्दलची खरीखोटी माहिती दिलेली असते.




जुन्याजाणत्यांच्या अनुभवांपासून ते मैत्रीपूर्ण सल्ल्यांपर्यंत, केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या घरगुती उपचारांपासून ते नैसर्गिक उपचारांपर्यंत साऱ्यांचा भडिमार होताना दिसतो. त्यामुळे आपल्या 'मुरुमां'वरील उपचारांना सुरुवात करण्यापूर्वी या समस्येशी जोडलेल्या गैरसमजांपासून स्वतःला दूर नेणे आवश्यक आहे. **(क्रमशः)....**

## २ Joke विनोद




गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?
शिष्य : असत्यवादी.
गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?
शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## ३ Message संदेश



Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!
Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.
Ladka- kya me tumhara hath tham lu?
Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## ४ Thought सुविचार




जर विज्ञानावर शहाणपणाचे नियंत्रण नसेलत र ते भ्रमिष्टपणाने वागेल.
– स्पॅनिश म्हण

**संस्कृत सुभाषित**

**एकतः क्रतव : सर्वे सहस्त्रवर दक्षिणाः! अन्यतो रोगभीतानां प्राणिनां प्राण रक्षणम्॥**

अर्थ – हजारो रुपयांची दक्षिणा देऊन केल्या जाणाऱ्या यज्ञापेक्षा रोगाने भयभीत झालेल्या प्राणीमात्रांना जीवदान देणारे औषधोपचार श्रेष्ठ आहेत.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



आडवे शब्द
१. पोसणारा मालक
४. त्या प्रमाणे
६. शायर साहिर लुधियानवी यांना ही वास्तु प्रेमाचे प्रतीक न वाटता गरीब प्रेमिकांची खिल्ली उडवणारी वाटली होती!
९. अटकाव करणारा फास
११. गरजू, नडलेला
१३. काढलेली सुट्टी
१४. प्रयत्न
१५. घोडा
१६. पेरणी वगैरे काम
१८. कट्टर
१९. रोखलेली नजर
२०. बंधन
२१. नदीची बाजू
२३. रम्य
२५. ङ्गएकच प्यालाफ नाटकात सुधाकरला दारुचे व्यसन लावणारा
२७. आणि
२८. खुंट, आंचळ
३०. कापणे
३२. तमाशा कलाकार
३४. गेरू
३५. चकित करणारी घटना, अद्भुत गोष्ट
३८. न चावता रोग पसरविणारा कीटक
३९. पापड-कुरडया, भजी इत्यादी
४०. उत्तराधिकारी
४१. बोलता न येणारा
४२. प्रजा, लोक
४३. एकदम चकचकीत
४६. गोंधळ, थट्टा
४७. वाळ्याच्या सुगंधाचे अत्तर
४८. माराची खूण
४९. समर्थांचे पूर्वश्रमीचे आडनाव, मूळ अर्थ व्यवहरात अनुभवी
५०. ठोस, पुरेसा
५१. चिखल
५३. धान, टरफलासहित भात
५४. छोटे मासे
५५. च्या जवळ
५६. कामगिरी, उपद्व्याप (हिंदी)
५७. कडक परीक्षा
६०. तजवीज
६२. मकालफ आणि मउद्याफ्मेक्षा महत्त्वाचा दिवस
६३. घागरा
६५. याला पडचाकर कशाला?
६६. निश्चिंत
६७. चाहूल
६९. कमळाचे तळे
७०. रथ चालविणारा
७१. नृसिंह

उभे शब्द
२. हेलपाटे घालणारे घोड्याचे पिल्लू
३. दरवाजा
४. तेलाचा थर, तर्री
५. जव, सातू
६. पत्र संपल्यावर लिहिलेला मजकूर
७. माजलेला
८. लक्षाधीश
९. धम्मक लाडू-बरोबरची पोळी!
१०. झटकन
१२. धरण, तळे
१५. उपयोग
१७. कोवळी फांदी
२०. जीवन, आप
२२. विपत्तीची कहाणी
२४. मधुमक्षिका
२५. अखेर, शेवट
२६. मध्यम प्रतीचा
२८. रस्ता असल्यास वळण नसलेला, मनुष्य असल्यास चांगल्या वळणाचा
२९. श्रीमंत
३१. लोणी
३२. अंधाराचा शत्रू याअर्थी सूर्याचे नाव
३३. गेय कविता लिहिणारा
३४. मऊ, मोकळा (शिजवलेला भात)
३६. आशीर्वाद
३७. हावरटपणा, वखवख
४२. निकट
४४. त्वरित, लगेच
४४अ. चालत्या गाड्याला अटकाव
४५. मोठा पाऊस
४७. नावाडी, गलबतावरील कामगार
४९. गुद्दा
५१. कमळ
५२. नम्रतेने वाकलेला
५४. महिना
५५. पायी चालणारा
५८. वस्तूंची यादी
५९. भरणाऱ्याला डोईजड, चुकवणारा गब्बर!
६१. रमापती
६२. लढाऊ जहाजांचा ताफा
६३. हारातील लोलक
६४. आनंद
६६. मांजा गुंडाळण्याचे साधन
६७. पंख
६८. पृथ्वी

आडवे उत्तर
१.पोशिंदा ४.तसाच ६.ताजमहाल ९.चाप ११.गरजवंत १३.रजा १४.खटपट १५.वारू १६.लागवड १८.कडवा १९.टक २०.पाश २१.तीर २३.रमणीय २५.तळीराम २७.व २८.सड ३०.कर्तन ३२.तमासगीर ३४.काव ३५.नवलकथा ३८.माशी ३९.तळण ४०.वारस ४१.मुका ४२.जन ४३.लख-लखीत ४६.रफकळ ४७.खस ४८.वळ ४९.ठोसर ५०.सबळ ५१.पंक ५३.साळ ५४.मासळी ५५.पाशी ५६.करतूत ५७.धारकस ६०.तरतूद ६२.आज ६३.परकर ६५.चाकर ६६.आश्वस्त ६७.पदरव ६९.कमलाकार ७०.सारथी ७१.नरवर

उभे उत्तर
२.शिंगरू ३.दार ४.तवंग ५.सातव ६.ताजा कलम ७.मस्तवाल ८.लखपती ९.चापट १०.पटकन १२.जलाशय १५.वापर १७.डहाळी २०.पाणी २२.रडकथा २४.मधमाशी २५.तड २६.रासवट २८.सरळ २९.धनवान ३१.नवनीत ३२.तमारि ३३.गीतकार ३६.वर ३७.लसलस ४२.जवळ ४४.लवकर ४४अ.खीळ ४५.मुसळ-धार ४७.खलाशी ४९.ठोसा ५१.पंकज ५२.नतमस्तक ५४.मास ५५.पादच-ारी ५८.रकमाला ५९.कर ६१.रमावर ६२.आरमार ६३.पदक ६४.मोद ६६.आसारी ६७.पर ६८.रसा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारताचा उपांत्य फेरीत फ्रान्सकडून पराभव; कांस्य पदकावर समाधान

कोपनहेगन–डेन्मार्कच्या हॉर्सेन्स येथे झालेल्या थॉमस कप २०२६ च्या उपांत्य फेरीत भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाला फ्रान्सकडून पराभव स्वीकारावा लागला. लक्ष्य सेनची अनुपस्थिती संघाला महागात पडली. पराभव पत्करूनही, भारतीय संघाने कांस्य पदक जिंकले आणि २०२२ मधील सुवर्णपदकानंतर थॉमस कपच्या इतिहासातील आपले दुसरे पदक निश्चित केले. पॅरिस २०२४ मध्ये उपांत्य फेरी गाठणारा आणि जागतिक बॅडमिंटन क्रमवारीत ११ व्या स्थानावर असलेला, भारताचा अव्वल क्रमांकाचा पुरुष एकेरी बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन या सामन्यात सहभागी नव्हता. शुक्रवारी चायनीज तैपेईविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात लक्ष्यला कोपराला दुखापत झाली होती.लक्ष्य स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर, आयुष शेट्टीने भारताचा पहिला सामना जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या ख्रिस्तो पोपोव्हविरुद्ध खेळला, पण १८ व्या क्रमांकावरील हा भारतीय बॅडमिंटनपटू ३९ मिनिटांत ११–२१, ९–२१ ने पराभूत झाला. आयुषने ऑल इंग्लंड ओपन चॅम्पियन लिन चुन्यीला पराभूत करून आपल्या संघाला उपांत्यपूर्व फेरीत एक शानदार विजय मिळवून दिला होता, तो शुक्रवारच्या कामगिरीची पुनरावृत्ती करू शकला नाही.

### ऐन आयपीएल मध्ये राजस्थान रॉयल्सची विक्री

**जयपूर**–आयपीएल फ्रँचायझी राजस्थान रॉयल्स संदर्भात एक मोठा व्यावसायिक करार समोर आला आहे. उद्योगपती लक्ष्मी मित्तल आणि आदित्य मित्तल यांच्या नेतृत्वाखालील मित्तल कुटुंबाने, आदर पूनावाला यांच्या भागीदारीत राजस्थान रॉयल्स विकत घेण्याचा करार केला आहे.

किती रुपयांत खरेदी केली फ्रँचायझी : या कराराचं एकूण मूल्य अंदाजे १५,६६० कोटी रुपये असल्याचं वृत्त आहे. यामध्ये केवळ आयपीएल संघाचाच नव्हे, तर दक्षिण आफ्रिकेचा पार्ल रॉयल्स आणि कॅरिबियन प्रीमियर लीग संघ बार्बाडोस रॉयल्स यांचाही समावेश आहे. हा करार पूर्ण झाल्यावर, मित्तल कुटुंबाकडे अंदाजे ७५ टक्के हिस्सा असेल, तर आदर पूनावाला यांच्याकडे अंदाजे १८ टक्के हिस्सा राहील. उर्वरित अंदाजे ७ टक्के हिस्सा मनोज बदाळे यांच्यासह विद्यमान गुंतवणूकदारांकडे असेल. बदाळे संघाशी संबंधित राहतील आणि फ्रँचायझीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतील. मात्र, हा करार अद्याप पूर्णपणे अंतिम झालेला नाही. यासाठी अद्याप भारतीय क्रिकेट नियामक मंडळ, भारतीय स्पर्धा आयोग आणि आयपीएल नियामक परिषदेसह इतर नियामक संस्थांकडून मंजुरी मिळणं आवश्यक आहे. या करारानंतर, लक्ष्मी निवास मित्तल, आदित्य मित्तल, वनिषा मित्तल भाटिया, आदर पूनावाला आणि मनोज बदाळे हे राजस्थान रॉयल्सच्या संचालक मंडळात सामील होतील.

### सुनील नरेनचा वर्ल्ड रेकॉर्ड, अशी कामगिरी करणारा पहिलाच खेळाडू

मुंबई–३७ वर्षीय सुनील नरेनच्या फिरकीच्या जादू अजूनही आयपीएलमध्ये तशीच पाहायला मिळत आहे. सुनील नरेनने कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्यात विक्रमांची रांग लावली. सुनील नरेनने या सामन्यात २ महत्त्वाच्या विकेट्स घेत हैदराबादला सर्वबाद करण्यात मोलाची भूमिका बजावली. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादचा संघ फक्त १६५ धावांवर १९व्या षटकात सर्वबाद झाला. यासह सुनील नरेनने मोठा इतिहास घडवला आहे.कोलकाता नाईट रायडर्सच्या अनुभवी फिरकीपटूने सनरायझर्स हैदराबादविरूद्ध सामन्यात दुसरी विकेट घेत २०० आयपीएल बळींचा टप्पा गाठला. आयपीएलच्या इतिहासात २०० बळी घेणारा तो पहिला परदेशी गोलंदाज ठरला आहे. राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये सनरायझर्स हैदराबादविरुद्ध मधल्या फळीतील फलंदाज सलील अरोराला बाद करून त्याने हा पराक्रम केला.

आयपीएलमध्ये २०० बळी घेणारा नरेन आता एकूण तिसरा गोलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी केवळ युझवेंद्र चहल आणि भुवनेश्वर कुमार या एलिट क्लबचा भाग होते. विशेष म्हणजे, नरेनने २०12 पासून केवळ कोलकाता नाईट रायडर्सकडून

# वॉशिंग्टनचा विजयी षटकार अन अखेरच्या षटकात गुजरातचा रोमांचक, थरारक विजय

**नवी दिल्ली:** गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील सामना फारच अटीतटीचा झाला. गुजरात टायटन्सने अखेरच्या षटकात टेबल टॉपर पंजाब किंग्सवर ४ विकेट्सने रोमांचक विजय मिळवला. या विजयासह आता गुजरात टायटन्स संघाचेही १२ गुण झाले आहेत. पण १३ गुणांसह पंजाब किंग्सचा संघ अजूनही गुणतालिकेत पहिल्या स्थानी आहे. पंजाबला प्लेऑफ गाठण्यासाठी फक्त दोन सामने जिंकण्याची गरज आहे. पण प्लेऑफच्या उंबरठ्यावर असताना पंजाबने गेले दोन सामने गमावले आहेत. पंजाबने प्रथम फलंदाजी करताना १६४ धावांचं आव्हान दिलं होतं, गुजरातने हे आव्हान १९.४ षटकांत गाठलं.

गुजरातच्या डावातील अखेरच्या दोन षटकांत काय घडलं?

गुजरात टायटन्सला अखेरच्या २ षटकांत म्हणजेच १२ चेंडूत विजयासाठी १७ धावांची गरज होती. अर्शदीप १९वं षटक टाकण्यासाठी आला. अर्शदीपने पहिल्या चार चेंडूवर ५ धावा दिल्या आणि पाचव्या चेंडूवर जेसन होल्डरला बाद करत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली. यासह आता अखेरच्या षटकात गुजरातला विजयासाठी ११ धावांची गरज होती. मार्कस स्टॉयनिसला अखेरचं षटक टाकण्याची जबाबदारी देण्यात आली. त्याने पहिला चेंडू वाईड टाकला, यानंतर पहिल्या लीगल चेंडूवर यॉर्कर चुकल्याने अरशद खानने चौकार लगावला. यानंतर अरशदने मोठा फटका खेळला, पण सूर्यांश झेल टिपू शकला नाही आणि तितक्यात दोन धावा घेतल्या. चौथा चेंडू डॉट बॉल राहिला. यासह ३ चेंडूत ४ धावांची गरज होती, चौथा चेंडू यॉर्कर टाकला आणि चेंडू टोलवून अरशद एक धाव घेण्यासाठी धावला आणि स्टॉयनिस त्याला धावबाद करण्यात अपयशी ठरला. दुसऱ्या चेंडूवर वॉशिंग्टन सुंदरने षटकार लगावत संघाला शानदार विजय मिळवून दिला.

पंजाबने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरूवात चांगली झाली. पण शुबमन गिल लवकर बाद झाला. गिल ५ धावांवर बाद झाल्यानंतर साई सुदर्शनने ४१ चेंडूत ५ चौकार व एका षटकारासह ५७ धावांची खेळी केली. तर जोस बटलर २६ धावा करत बाद झाला. निशांत सिंधूने १५ धावांचं योगदान दिलं. वॉशिंग्टन सुंदरने अखेरच्या षटकापर्यंत सावध खेळी करत कायम होता आणि संघाला गरज असताना त्याने मार्कस स्टॉयनिसच्या अखेरच्या षटकात षटकार खेचत संघाला विजय मिळवून देत माघारी परतला.



पंजाबच्या गोलंदाजांनी देखील सामन्यात सावध गोलंदाजी केली. विजयकुमार वैशाकने २ विकेट्स तर अर्शदीप सिंग, मार्को यान्सन व मार्कस स्टॉयनिस यांनी १–१ विकेट्स घेतल्या.

गुजरात टायटन्सने सामन्याची नाणेफेक जिंकत पंजाबला फलंदाजीसाठी पाचारण केलं. मोहम्मद सिराजने गोलंदाजीची दणक्यात सुरूवात पहिल्याच षटकात प्रियांश आर्य आणि कुपर कॉनोलीला बाद करत पंजाबला मोठा धक्का दिला. यानंतर प्रभसिमरन सिंग १५ धावा तर कर्णधार श्रेयस अय्यर १९ धावा करत बाद झाले. तर नेहाल वधेरा शून्यावर बाद झाला. ४७ धावांवर ५ विकेट्स अशी अवस्था असताना सूर्यांश शेडगे फलंदाजीला आला आणि त्याने संघाला संकटातून बाहेर काढलं.



## मित्तल कुटुंबीयाने आदर पूनावालांसह राजस्थान रॉयल्स संघ १५,६६० कोटी रुपयांना घेतला विकत

मुंबई–राजस्थान रॉयल्सला नवीन मालक मिळाले आहेत. स्टील किंग लक्ष्मी मित्तल आणि सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मालक आदर पूनावाला यांनी फ्रँचायझीमधील बहुसंख्य भागभांडवल विकत घेतले आहे. एकत्रितपणे, त्यांच्याकडे एकूण ९३ टक्के हिस्सा असेल. मित्तल कुटुंबाकडे ७५ टक्के, तर पूनावाला कुटुंबाकडे १८ टक्के हिस्सा राहील. उर्वरित ७ टक्के हिस्सा सध्याचे मालक मनोज बदाळे आणि इतरांकडे असेल. याबाबत एक करार झाला आहे.

आयपीएल २०२६ च्या आधी, भारतीय–अमेरिकन उद्योगपती कल सोमानी आणि त्यांच्या समूहाने अंदाजे १.६३ अब्ज डॉलर्स (१५,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त) मध्ये राजस्थान रॉयल्सची १००म मालकी मिळवली. या मोठ्या करारामुळे ही आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडी फ्रँचायझी ठरली. पण, आर्थिक अडचणींमुळे हा करार रखडला.या व्यवहारात मित्तल कुटुंब आणि आदर पूनावाला यांना राजस्थान रॉयल्स पुरुष फ्रँचायझी, पर्ल रॉयल्स आणि बार्बाडोस रॉयल्स यांचे एंटरप्राइज व्हॅल्यू मिळाले. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, आता नवीन मालक उर्वरित राजस्थान रॉयल्स संघांचेही मालक असतील.हा करार पूर्ण होणे हे बीसीसीआय, सीसीआय, आयपीएल गव्हर्निंग कौन्सिल आणि इतर संबंधित नियामक प्राधिकरणांच्या मंजुरीसह, नेहमीच्या अंतिम अटींच्या अधीन आहे. हा करार २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत (ट३) पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

''लक्ष्मी एन. मित्तल आणि आदित्य मित्तल यांनी जाहीर केले की, मनोज बदाळे आणि एका संघाकडून आदर पूनावाला यांच्या भागीदारीत राजस्थान रॉयल्स विकत घेण्यासाठी एक निश्चित करार झाला आहे.'' पुनर्गठित राजस्थान रॉयल्सच्या संचालक मंडळात लक्ष्मी एन. मित्तल, आदित्य मित्तल, वनिषा मित्तल–भाटिया, आदर पूनावाला आणि बदाळे यांचा समावेश असेल.लक्ष्मी एन. मित्तल यांनी या कराराबद्दल म्हटले, ''मला क्रिकेट आवडते आणि माझे कुटुंब राजस्थानचे आहे, त्यामुळे राजस्थान रॉयल्सपेक्षा दुसऱ्या कोणत्याही आयपीएल संघाचा भाग होण्याची माझी इच्छा नाही.''लक्ष्मी मित्तल यांचा मुलगा आदित्य पुढे म्हणाला, ''रॉयल्स संघ नवीन प्रतिभा घडवण्यासाठी ओळखला जातो – मला याचे खरोखरच कौतुक वाटते, आणि आम्ही हा वारसा पुढे चालू ठेवण्यास आणि भविष्यातील यशासाठी जगातील सर्वोत्तम प्रतिभेचा उपयोग करण्यास कटिबद्ध आहोत.''यापूर्वी बंगळूरुसाठी बोली लावलेले आदर पूनावाला म्हणाले, ''राजस्थान रॉयल्सला एक जागतिक क्रीडा संस्था बनवण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मदत केली त्या सर्वांचे मी आभार मानू इच्छितो – क्रिकेटपटू, प्रशिक्षक, नेतृत्व संघ आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चाहते.''

## मुंबई इंडियन्सचे आव्हान जवळपास संपुष्टात

चेन्नई–हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्ससाठी आयपीएल २०२६ चा हंगाम जवळपास संपला आहे. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात मुंबईचे फलंदाज पुन्हा एकदा अपयशी ठरले आणि त्यांना केवळ १५९ धावा करता आल्या. कर्णधार ऋतुराज गायकवाड (६७ङ) आणि कार्तिक शर्मा (५४ङ) यांच्या खेळीच्या जोरावर चेन्नई सुपर किंग्सने ८ गडी राखून एक मोठा विजय मिळवला. हा पराभव मुंबईचा त्यांच्या नवव्या सामन्यातील सातवा पराभव ठरला. जरी त्यांनी त्यांचे उर्वरित पाच सामने जिंकले, तरी ते जास्तीत जास्त १४ गुणच मिळवू शकतील, ज्यामुळे प्लेऑफमधील स्थान मिळवणे शक्य होईल.

कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रत्युत्तरात, मुंबईची सुरुवात खराब झाली, ज्यात विल जॅक्स केवळ १ धावेवर बाद झाला. रायन रिकल्टनने २४ चेंडूंमध्ये ३७ धावा केल्या, तर नमन धीरने जीवदान मिळाल्यानंतर ४ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ३७ चेंडूंमध्ये ५७ धावा केल्या.

इतर कोणताही फलंदाज जास्त वेळ टिकू शकला नाही, त्यामुळे मुंबई इंडियन्स ७ गडी गमावून केवळ १५९ धावाच करू शकली. चेन्नईकडून अंशुल कंबोजने उत्कृष्ट गोलंदाजी करत ३ बळी घेतले. पदार्पण करणाऱ्या रामकृष्ण घोषने ३ षटकांत २४ धावा देऊन ३ बळी घेतले.१६० धावांचे लक्ष्य गाठताना, चेन्नई सुपर किंग्सचा सलामीवीर संजू सॅमसन बुमराहच्या गोलंदाजीवर अवघ्या ११ धावांवर बाद झाला.

## धक्कादायक! रोहित शर्मा अन् मुंबई इंडियन्सचे नाते संपले?



### हिटमॅनच्या फॅन्ससाठी मोठी बातमी; व्हायरल पोस्टमागचे काय आहे सत्य?

मुंबई–रोहित शर्मा शेवटचा आयपीएल २०२६ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळूरविरुद्ध खेळताना दिसला होता. फलंदाजी करताना त्याला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली आणि तेव्हापासून तो मुंबई इंडियन्सचे पाच सामने खेळू शकलेला नाही. दरम्यान, मुंबई इंडियन्स संघात काहीतरी बिनसल्याच्या अफवा पसरत आहेत. एक पोस्ट व्हायरल होत आहे, ज्यात असा दावा केला जात आहे की मुंबई इंडियन्सचे व्यवस्थापन पुढच्या हंगामापूर्वी रोहितला संघातून मुक्त करू शकते. या व्हायरल दाव्यामागे सत्य काय आहे? मुंबई सोडल्यानंतर रोहित आयपीएलमधून निवृत्ती जाहीर करेल का?

रोहित शर्मा निवृत्त होणार का?

सोशल मीडियावर एक पोस्ट व्हायरल होत आहे. त्यात असा दावा केला जात आहे की रोहित शर्मा पूर्णपणे तंदुरुस्त आहे, परंतु मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाला त्याला खेळवायचे नाही. पोस्टमध्ये असे वृत्त दिले आहे की, जर रोहित शर्माची इच्छा असेल तर मुंबई इंडियन्स त्याला पुढच्या हंगामात संघातून मुक्त करू शकते. रोहितला इतर कोणत्याही फ्रँचायझीसाठी खेळायचे नसल्यामुळे, तो आयपीएलमधून निवृत्ती जाहीर करेल. हे लक्षात घ्यावे की या व्हायरल पोस्टमध्ये केलेले सर्व दावे खोटे आहेत. नुकतेच, मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने यांनी माहिती दिली की, रोहित लवकर बरा होत आहे, परंतु वैद्यकीय पथकाकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतरच त्याचे मैदानावर पुनरागमन शक्य होईल. या विधानावरून हे स्पष्ट होते की, संघ व्यवस्थापन त्याच्या लवकर परतण्याची अपेक्षा करत आहे आणि त्याला संघातून मुक्त करण्याचा विचार करत नाही.

रोहित शर्मा शेवटचा मैदानावर उतरून जवळपास तीन आठवडे झाले आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे की हॅमस्ट्रिंगच्या दुखापती बऱ्या होण्यासाठी काही आठवड्यांपासून ते अनेक महिन्यांपर्यंतचा कालावधी लागू शकतो. जर हॅमस्ट्रिंगची दुखापत अधिक गंभीर असेल, तर रोहित शर्मासारख्या जागतिक दर्जाच्या खेळाडूलाही बरे होण्यासाठी १–२ महिने लागू शकतात.

मुंबईला ५ वेळा चॅम्पियन बनवले

हा तोच रोहित शर्मा आहे, ज्याने आपल्या कर्णधारपदाखाली मुंबई इंडियन्सला पाच आयपीएल विजेतेपदे मिळवून दिली आहेत. रोहितच्या कर्णधारपदाखाली मुंबई इंडियन्सने २०१३, २०१५, २०१७, २०१९ आणि २०२० मध्ये आयपीएल ट्रॉफी जिंकली. २०२४ च्या हंगामापासून हार्दिक पांड्या मुंबई संघाचे कर्णधारपद भूषवत आहे.

# बृजभूषण यांनी छळ केलेल्या त्या सहा पीडितांपैकी मी एक: विनेश फोगाट



**नवी दिल्ली:** विनेश फोगाट हिने धक्कादायक खुलासा करत माजी कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केलेल्या सहा महिला कुस्तींपटूमधील ती एक असल्याचं तिने सांगितलं. महिला कुस्तीपटू विनेश फोगाटने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करून महिला कुस्तीपटूंच्या लैगिंक छळाबाबत एक मोठा खुलासा केला आहे. दीर्घकाळ सुरू असलेल्या कुस्ती व्यवस्थेविरुद्धच्या संघर्षाला धक्कादायक वळण देत ऑलिम्पियन विनेश फोगाट हिने गंभीर आरोप केले आहेत. तिने सांगितलं की, माजी कुस्ती महासंघाचे अध्यक्ष बृजभूषण सिंह यांच्याकडून लैंगिक छळ झालेल्या सहा महिला कुस्तीपटूंमध्ये तिचा स्वतःचाही समावेश आहे.

विनेशने भावनिक व्हीडिओ शेअर करत हा खुलासा तिने केला आहे. या मोठ्या प्रकरणात स्वतःला पीडित म्हणून सार्वजनिकपणे कबुली तिने दिली आहे. यापूर्वी तिने आपली ओळख गुप्त ठेवली होती. विनेशने सांगितलं की ङ्ककाही विशिष्ट परिस्थितींमुळेङ्घ तिने हा खुलासा करण्याचा निर्णय घेतला. विनेशच्या मते, सध्याचा कुस्ती महासंघ २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धांपूर्वी तिच्या पुनरागमनाला अडथळा आणण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न करत आहे. बृजभूषण सिंह यांच्याविरुद्धचा कायदेशीर खटला सध्या न्यायालयात प्रलंबित असून, साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. विनेश फोगाट यांनी सांगितलं की सुरुवातीला त्यांनी आपली ओळख उघड न करता कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊ द्यायची होती. ङ्कसर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पीडितेची ओळख उघड करू नये, कारण ते तिच्या सन्मान आणि प्रतिष्ठेशी संबंधित आहे. पण आज काही परिस्थितींमुळे मला तुम्हा सर्वांना काही सांगायचं आहे. खटला अजून सुरू असताना बोलायचं मला नव्हतंः पण मी सांगू इच्छिते की तक्रार करणाऱ्या त्या सहा पीडितांपैकी एक मी स्वतः आहे आणि आमची साक्ष घेण्याची प्रक्रिया अजून सुरू आहेत.ङ्घ असं विनेशने रविवारी, ३ मे रोजी सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओत सांगितलं.

२०२३ मध्ये नवी दिल्लीतील जंतर–मंतर येथे झालेल्या आंदोलनात विनेश फोगाट या प्रमुख चेहऱ्यांपैकी एक होती, जिथे सर्वांनी मिळवून बृजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात जोरदार आवाज उठवला होता.

ङ्कएका महिलेसाठी अशा परिस्थितीत स्पर्धेत उतरणं खूप कठीण असतं, आणि ज्यांनी अशा प्रसंगाचा सामना केला आहे, त्या प्रत्येक खेळाडूला हे समजू शकतं.ङ्घ असं विनेश फोगाटने सांगितलं.



## लॉर्ड श्री कृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्री कृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्या रुपाली कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, संगीता शेटे यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या शिक्षिका रुपाली कोकाटे यांनी सूत्रसंचलन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## राज्यात उष्णतेच्या लाटेचे संकट

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबईसह राज्यभरातील तापमानात सातत्याने बदल होत आहेत. गेल्या काही दिवसांपासून तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे राहिले आहे. अशात आता भारतीय हवामान विभागाने मोठा इशारा देत राज्यात उष्णतेचा अलर्ट जारी केला आहे. तसेच, मुंबईसह कोकण, मराठवाडा आणि विदर्भात आजपासून उन्हाच्या झळा अधिक तीव्र असल्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामध्येच काही भागात पावसाचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ५ मे पर्यंत मुंबईत उष्णतेचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील जवळपास जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे नोंदवले गेले. आज उष्णतेत वाढ होण्याचा अंदाज आहे. या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून नागरिकांना काही सूचना जारी करण्यात आल्या आहेत. कधी उष्णता तर कधी पाऊस यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. यासोबतच गेल्या काही दिवसांपासून उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ होत आहे.

मुंबईसह कोकणात उष्ण आणि दमट हवामान कायम आहे. हवेतील आर्द्रता ७०-८० टक्क्यांवर राहील. कमाल तापमान ३३-३७ अंशांच्या दरम्यान राहील, असाही अंदाज वर्तवला आहे. मध्य महाराष्ट्रातील पुण्यासह सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापुरात उष्णतेचा पारा चढलेला आहे. कमाल तापमान ३७-४० अंशांच्या दरम्यान आहे. हवामान उन्हाळी कोरडे राहील. काही ठिकाणी हलकी उष्णतेची लाट जाणवेल.

## महाराणाप्रताप नगरचा चेहरा-मोहरा बदलणार: आ. अमित देशमुख



**लातूर /प्रतिनिधी :** लातूर शहरालगत असलेल्या नवीन वस्त्या आणि गावांमध्ये शहराप्रमाणेच दर्जेदार सोयीसुविधा पुरवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. हद्दवाढीच्या तांत्रिक अडचणींमुळे नागरिक सुविधांपासून वंचित राहू नयेत, यासाठी आमदार निधीतून एकत्रित मोठी तरतूद करुन विकासकामांना चालना देण्यात येत आहे. त्याअंतर्गत महाराणाप्रताप नगरचा चेहरा-मोहरा बदलु, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत महाराणाप्रताप नगर (बुऱ्हाणनगर) येथील १ कोटी ६० लाख रुपये निधीतून मंजूर विविध विकासकामांचे भूमीपूजन माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते आणि खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि. २९ एप्रिल रोजी सायंकाळी पार पडले. लातूर शहरालगत असलेल्या नवीन वस्त्या व गावामध्ये शहराप्रमाणेच सोयीसुविधा पुरवण्याचा उद्देश ठेवून, महाराणाप्रतापनगर ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या विविध वस्त्यांमध्ये मूलभूत सोयी सुविधा पुरवण्यासाठी आमदार निधीमधून एकत्रितरित्या तरतूद केली आहे. एकाच वेळी अनेक योजना एका गावात राबवल्यास त्या कामांचा दर्जा चांगला राहून नागरिकांना दीर्घकाळापर्यंत सोयी सुविधांचा लाभ घेता येऊ शकतो, असा विचार करून एकाच गावात मोठ्या प्रमाणात विकास योजनांचा शुभारंभ करण्यात येत असल्याचे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महेबूब साकोळकर यांची उपस्थिती होती तर लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, परिवहन समितीचे सभापती फैसलखान कायमखानी, सभागृह नेते विजयकुमार साबदे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन अँड. समद पटेल, अँड. फारुख शेख, पुजा जाधव, प्रिया उफाडे, विजय देशमुख, तुकाराम आडे, विष्णु धायगुडे, गोविंद देशमुख, राजकुमार पवार, संजय आडे, मनोज थोरात, शहनाज गोलदांज, तब्बसुम शेख, डॉ. दिनेश नवगिरे, अमोल देशमुख, राम स्वामी, संजय ओहोळ, सत्यवान कांबळे, तौफिक सय्यद आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, महाराणा प्रताप नगर, बुऱ्हाणनगर भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या शिक्षकांचे संस्कार, ज्ञान कायम जिवंत राहते - ऋषिकेश कराड

## श्रीराम विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा





**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षक म्हणजे गुरु आणि गुरु म्हणजे विचार हा विचार कधीच सेवानिवृत्त होत नसतो तो विचार सातत्याने ज्वलंत राहणारा आहे. शिक्षक हे केवळ शिकवत नाही तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्याचे काम करतात त्यांचे संस्कार आणि ज्ञान कायम जिवंत राहतात खऱ्या अर्थाने शिक्षक हे कधीच निवृत्त होत नाहीत तर ते कायम मार्गदर्शकाच्या भूमिकेतून कार्यरत राहणारे व्यक्तिमत्व आहे असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर येथील रेणुका शिक्षण संस्थेच्या श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे यांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा शुक्रवार १ मे २०२६ रोजी मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार श्री विक्रम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला यावेळी ऋषिकेशदादा कराड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी माजी आमदार बब्रुवान खंदाडे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, पसं उपसभापती शरद दरेकर, रेणापुरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, जेष्ठ मार्गदर्शक ओमप्रकाश गोडभरले, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदास कुटवाड, सचिव पंडितराव उगले, उपाध्यक्ष रविकांत आकनगिरे, नगरपंचायतीचे राजू आत्तार, दत्ता सरवदे, पदमसिंह पाटील, सचिन मोटेगावकर, चेअरमन देविदास कातळे, संस्थेचे विठ्ठल कटके, सुधीर बरुरे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

शाळेत जाईपर्यंत आई-वडिल घडवतात आणि आयुष्याला दिशा देण्याचे काम शिक्षक करीत असतात. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया असून शिक्षकांच्या गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच अनेकांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडले असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, सिद्धेश्वर मामडगे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या त्याचबरोबर संस्थेच्या प्रगतीत मोलाची कामगिरी केली असून आज जरी ते सेवानिवृत्त होत असले तरी उर्वरित आयुष्यातील वाटचालीचा समाजासाठी, कुटुंबासाठी आणि स्वत:साठी नवा अध्याय सुरू करत आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा प्रकाश सतत पसरत राहील त्यांच्या हातून या पुढील काळातही समाजाची सेवा घडो अशा सदिच्छा दिल्या.

गावचे सरपंच, चेअरमन, पतसंस्थेचे चेअरमन जिथे जाईल तिथे मिळालेल्या संधीच सोनं करण्याचा प्रयत्न विविध पुरस्कार प्राप्त सिद्धेश्वर मामडगे सरांनी केला असल्याचे उद्गार काढून आ. विक्रम काळे म्हणाले की, हजारो विद्यार्थी घडविण्याचे काम त्यांच्या हातून झाले असून शिकून किती गेले यापेक्षा शिकलेले काय करतात हे महत्त्वाचे आहे. मामडगे सरांनी अत्यंत निष्ठेने कर्तव्य निभावले आहे. प्रत्येक कामात स्वतःला झोकून देऊन कार्य केले असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. प्रारंभी अनिल कुटवाड यांनी आपल्या प्रास्ताविकातून सिद्धेश्वर मामडगे यांच्या कार्याचा आढावा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्वर स्वामी आणि लोकां शेवाळे यांनी केले. या कार्यक्रमास शैक्षणिक सामाजिक व इतर विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव १००% निकालाची उज्ज्वल परंपरा कायम




**लातूर/प्रतिनिधी :**बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील इयत्ता १२ वी (कडउ) बोर्ड परीक्षेचा निकाल यंदाही उल्लेखनीय ठरला असून महाविद्यालयाने शंभर टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विज्ञान शाखेने १००% निकालासह विशेष कामगिरी नोंदवली असून राजवर्धन जितेंद्र पाटील प्रथम, यशराज उद्धव माने द्वितीय व यशराजे योगेश देशमुख तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

वाणिज्य शाखेत ९६.१५% निकाल लागला असून यशोदा गोपाळ जाधव हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर सुमैय्या ताजोद्दीन पटेल व पायल हनुमंत क्षीरसागर यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेत ९५.९१% निकाल लागला असून प्रथमेश गणेश सूर्यवंशी प्रथम, रुपेश महादेव गायकवाड द्वितीय व शिवम ज्ञानदेव मस्के तृतीय क्रमांकावर राहिले. बारावी व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये ८७.७९ % इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी

प्रथम लोंढे अंकिता विजय,द्वितीय वाले कार्तिक सतीश तृतीय राठोड जयवंत ( हॉर्टिकल्चर) हे गुणानुक्रमे कनिष्ठ महाविद्यालयातून मानकरी ठरले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख, सचिव शाम माणिकराव देशमुख, संस्थेचे सर्व पदाधिकारी संचालक, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी अभिनंदन केले आहे. त्यांना प्रा. विवेक कदम, प्रा.नंदा खरटमल, प्रा.बालिका गौंड प्रा. संतोष कल्याणकर, प्रा.अंकिता वाडकर, प्रा. महारुद्र बिडवे प्रा.शिल्पा हालशिकर, प्रा. देशमुख, प्रा. विजय सगर, प्रा.हरिहर गायके प्रा. संदिपान चेवले, प्रा. ज्ञानदेव कांबळे इत्यादी प्राध्यापक, शिक्षकवृंदांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले असल्याची भावना व्यक्त करण्यात येत असून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## नगर पंचायतसमोर नगरसेवक लखनगावे यांचे उपोषण




**शिरूर अनंतपाळ /प्रतिनिधी :** येथील नगरपंचायत कार्यालयात कार्यरत असलेल्या एका स्थापत्य अभियंत्यावर भ्रष्टाचार व मनमानी व गलथान कारभाराचे आरोप करीत त्यांच्याकडील पद्धार काढून घेण्यात यावा, या मागणीसाठी नगरपंचायतसमोर सुधीर नगरसेवक लखनगावे यांनी उपोषण सुरू केले आहे.

नगरसेवकांनी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्याकडे २३ एप्रिल रोजी नगरसेवक सुधीर लखनगावे, पाणी पुरवठा सभापती उमाकांत देवंगरे, अर्थ व नियोजन सभापती सौ. श्रीदेवी संभाळे, माजी उपनगराध्यक्षा सौ. सुषमा मठपती, माजी सभापती संतोष शिवणे, श्रीमती पार्वती देवंगरे, सौ.रागिणी शिवणे निवेदन देऊन सदरील मागणी केली आहे. शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीत कार्यरत असलेल्या अतिरिक्त स्थापत्य अभियंत्याचा कार्यकाळ वादग्रस्त ठरला असून त्यांच्या कारभारात भ्रष्टाचार, मनमानी आणि कार्यालयीन पद्धत चुकीची असल्याच्या तक्रारी अनेकदा करण्यात आल्या आहेत. या बाबत विविध सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध पक्षांचे पदाधिकारी, सामान्य नागरिक यांनी यापूर्वीही त्यांच्या विरोधात अनेक लेखी तक्रारी केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तरीही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कडक कारवाई करण्यात आली नसल्याने सामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी वाढत आहे. त्यामुळे संबंधित अभियंत्यांचा शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीतील अतिरिक्त पदभार तात्काळ काढून घ्यावा,अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली होती. याबाबत योग्य ती कारवाई न झाल्यास ३० एप्रिलपासून नगरपंचायत कार्यालयासमोर लाक्षणिक आमरण साखळी उपोषण करण्यात येईल असा इशारा नगरसेवकांनी निवेदनातून देण्यात आला होता. त्यानुसार नगरसेवक सुधीर लखनगावे हे उपोषणाला बसले असून जो पर्यंत स्थापत्य अभियंत्याचा पदभार काढून घेणार नाही तोपर्यंत आमरण साखळी उपोषण करणार अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांच्या उपोषणाला शहरातील जनतेकडून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत असून या वेळी बस्वराज मठपती, बस्वराज शिवणे, महादेव आवाळे, अशोक कोरे, संदीप धुमाळे, भागवत नाब्दे, नामदेव लोखंडे, व्यंकट बेंबळगे, प्रतीक पारशेट्टे, चेतन मांदळे, सुरज आवाळे, विशाल सुगावे आदींनी उपोषणस्थळी उपस्थित राहून पाठिंबा दिला.

# अभिनय क्षेत्रातील जेष्ठ कलाकारांसाठी CAWT ला माझी स्वत:ची कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील एक एकर जागा देण्याची माझी तयारी आहे- रविंद्र चव्हाण

**लातूर/प्रतिनिधी :** अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी CAWT सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत केले.

सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (CAWT)आणि सिने अँड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने C-WT च्या स्थापनेत आणि CINTAA - CAWT टॉवरच्या उभारणीत ज्या विश्वस्थ कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले, त्यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख, अमरीश पुरी, अमजद खान, चंद्रशेखर वैद्य, दारासिंह या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी त्या कलाकारांचे फोटो आणि माहिती देणाऱ्या फलकाचे उदघाटन आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळेस ते बोलत होते.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो. तो चांगला काळ ओसरला कि सरत्या काळात त्या कलाकारांकडे कुणी पाहत नाही. त्यांची कुणी चौकशी करत नाहीत. असे



जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्या देखील मोठी आहे. याना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी मला आज दिली. या सर्व समस्यांचे निराकरण करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे.

तसेच CAWT ला जेष्ठ कलाकारांकरिता मी कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील माझी स्वतःची एक एकर जागा देण्यास तयार आहे, असे रविंद्र चव्हाण म्हणाले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी रविंद्र चव्हाण यांच्या सोबत जेष्ठ अभिनेत्री व CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू, ट्रस्टच्या सचिव अभिनेत्री संभावना सेठ, संस्थेचे खजिनदार अभिनेते दीपक पराशर, बॉलिवूड अभिनेते राजपाल यादव, मनोज जोशी, मुकेश ऋषी, आयुब खान, अभिनेत्री कुनिका आणि सिने व टीव्ही क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

## वाढत्या तापमानामुळे सावरी येथे २ बैल दगावले

**निलंगा/प्रतिनिधी :** तालुक्यातील सावरी येथे उष्णतेची तीव्रता वाढल्याने दोन बैलांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पंचनामा करण्यात आला आहे. सावरी येथील शेतकरी मदन श्रीरंग भंडारे यांच्या मालकीचे दोन बैल शेतात शेतमेहनत करून बाधले असताना बुधवारी रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान अचानक मृत अवस्थेत आढळले. संबंधित घटनेची माहिती मिळताच तलाठी यांनी पंचांच्या उपस्थितीत पाहणी केली. सकाळी बैलांकडून नांगरणीचे काम करून घेतल्यानंतर त्यांना झाडाखाली सावलीत बांधण्यात आले होते मात्र, दुपारच्या सुमारास पुन्हा कामासाठी वापर केल्यानंतर संध्याकाळी शेतात बांधून सदर शेतकरी गावाकडे गेला होता रात्री ९ वाजता शेताकडे आले असता बैल जमिनीवर कोसळलेल्या दिसून आले सदर बैलाचा मृत्यू वाढत्या उन्हामुळे त्यांना उष्माघात झाल्याचे समजते. या घटनेचा पंचनामा तलाठी बाळासाहेब मोहोळकर यांनी केला तर औराद शहाजानी येथे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रश्मी ठाकूर यांनी शवविच्छेदन केले आहे. प्राथमिक माहितीप्रमाणे सदर बैलाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आल्याचे समजले. दरम्यान निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी बैल झाडाखाली सावलीस बांधावे पुरेसे पाणी पिण्यास द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पंचांच्या मते, दोन्ही बैलांचा मृत्यू उष्णतेच्या झळांमुळे झाला असावा. मृत बैलांची एकूण अंदाजे किंमत सुमारे १ लाख ५० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या घटनेमुळे शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर जनावरांची काळजी घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## श्री केशवराज ज्युनिअर कॉलेजचे १२ वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर, दि.०२ मे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १२ वी (विज्ञान) बोर्ड परीक्षेच्या निकालामध्ये भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज ज्युनिअर कॉलेज, लातूर येथील विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले आहे. या परीक्षेमध्ये महाविद्यालयातील प्रथम चि. कृष्णा शाम कच्छवे यांनी ९१.५०%, द्वितीय चि. प्रसाद गजानन चव्हाण यांनी ८०.६७% व चि. ईशान शशीकांत मोगरेकर ८०.६७%, तृतीय चि. आशिष बालाजी कुलकर्णी यांनी ७८.५०% गुण प्राप्त करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर, सदस्य नरेंद्र पाठक, कॉलेजचे प्राचार्य मा. बालासाहेब केंद्रे, विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, सर्व पर्यवेक्षक, कॉलेज विभाग प्रमुख श्रीमती रेखा पुरी तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयाची १२ वी बोर्ड परीक्षेतील उज्ज्वल निकालाची परंपरा कायम

**लातूर/प्रतिनिधी :** दि.०२.०५.२०२६ रोजी १२ वी बोर्डाचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला. या निकालामध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.दयानंद विज्ञान महाविद्यालयाचा निकाल ९७.९२% लागला आहे.महाविद्यालयातील सरवदे श्रावणी महेश या विद्यार्थीनीने ९०.१७ % गुण मिळवून महाविद्यालयातून सर्वप्रथम क्रमांक पटकाविला.त्याचबरोबर पवार अंकिता अनंत व कातळे धैर्यशिल देविदास या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ८९.८३ % व ८८.३३ % गुण घेऊन गुणानुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळविला आहे.

दयानंद विज्ञान महाविद्यालयातून ८५% पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण १४ विद्यार्थी आहेत. त्याचप्रमाणे ८०% च्या वर गुण मिळविणारे ३९ विद्यार्थी व विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण विद्यार्थी संख्या ७९. तसेच प्रथम श्रेणीत ३२२ विद्यार्थी आहेत. समीक्षा जाधव या विद्यार्थिनीने संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले. तसेच गटाटे राचप्पा याने फिशरी सायन्स या विषयात २०० पैकी २०० गुण मिळविले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शाह व रमेशकुमार राठी, सचिव रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव विशालजी लाहोटी, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड व सर्व संस्था पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य भाऊसाहेब सरवदे, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरूडकर, पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे (वाडीकर), सीईटी समन्वयक प्रा. डॉ. कविता जाधव, जेईई समन्वयक रविकुमार, नीट समन्वयक डॉ. कोमल गोमारे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. विजय मांदळे,सीईटी सहसमन्वयक प्रा. व्यंकटेश कैले, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, महेंद्र कोराळे, नितेश दुधभाते, रोहित खंदाडे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय चा इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत निकाल

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा तर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी विज्ञान शाखेच्या मार्च २०२६ परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला असून, लातूर येथील श्री संगमेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय व रिलायन्स लातूर पॅटर्नने पुन्हा एकदा आपल्या देदीप्यमान यशाची परंपरा कायम ठेवली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.५% लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. गुणवंतांची यशोगाथा: संस्थेतून सुचिता कांबळे या विद्यार्थिनीने ९०.६६% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच स्नेहा डोंकारी (९०.१६%) याने द्वितीय आणि सागर रमेश कारीगार (९०.००%) याने तृतीय क्रमांक मिळवला आहे. संस्थेतील एकूण विद्यार्थ्यांमध्ये १६ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुण मिळवून संपादन केले. विषयवार उत्कृष्ट कामगिरी: संस्थेच्या दर्जेदार शिक्षणाची प्रचिती विषयवार निकालातूनही दिसून आली आहे.

भौतिकशास्त्र : १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ०९ विद्यार्थी.
रसायनशास्त्र : १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १३ विद्यार्थी.
गणित : १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १६ विद्यार्थी.
जीवशास्त्र : १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ०९ विद्यार्थी.

विद्यार्थ्यांच्या या उतुंग यशाबद्दल श्री संगमेश्वर चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थाध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव, संस्थेच्या सचिव तथा प्राचार्या सौ. सुलक्षणा केवळराम, कार्यकारी संचालक ओंकार होनराव, कोषाध्यक्षा प्रेरणा होनराव यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे अकॅडेमिक प्रमुख, रिलायन्स लातूर पॅटर्नची संपूर्ण तज्ज्ञ प्राध्यापक टीम, मेहनत घेणारे कर्मचारी वृंद आणि विद्यार्थ्यांची जिद्द व सातत्यपूर्ण अभ्यास असल्याचे मत संस्थाध्यक्षांनी व्यक्त केले. या यशाबद्दल लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे.

## राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचा ९५ टक्के निकाल

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२वी परीक्षेचा निकाल शनिवारी जाहीर झाला आहे. यात राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाचा निकाल ९५ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेत सोनाली शरद पंचगल्ले ही ८४.०० टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम, कृष्णा रंगनाथ निरगुडे ७९.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर सृष्टी अनिल बाहेती ७८.०० टक्के गुण घेत तृतीय आली आहे. तर कला शाखेत वैष्णवी रोहिदास गायकवाड ६५.०० टक्के गुण घेऊन प्रथम, आबेद अफजल शेख ५८.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर स्नेहा रमेश राठोड ५८.०० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. वाणिज्य शाखेत नाहेदाबानो खुनमीर मुंगले ८३.०० टक्के गुण मिळवून प्रथम, असिफ मोहमंद हनिफ शेख ६६.०० टक्के गुण द्वितीय, तर जयश्री दिगांबर गवळी ५२.०० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे.

या यशाबद्दल सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, विद्यापीठाचे डीन डॉ. बाविस्कर, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, प्रा. बी. बी. खटके, प्रा. आर. ए. बदने, प्रा. आर. एन. पटने, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदींनी कौतुक केले आहे.

## तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल

**लातूर/प्रतिनिधी :**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२वी परीक्षेचा निकाल शनिवारी जाहीर झाला आहे. यात तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाने घवघवीत यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत श्रेया गजानन क्षीरसागर ही विद्यार्थिनी ८२.१७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम, कृष्णा विजयकुमार किसवे ७७.०० टक्के गुण घेऊन द्वितीय तर कुलदिप कैलासराव झोल हा ७६.०० टक्के गुण मिळवून तृतीय आला आहे. या यशाबद्दल सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, विद्यापीठाचे डीन डॉ. बाविस्कर, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, प्रा. बी. बी. खटके, व्ही. व्ही. लोहारे, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, शिवकुमार चिकले यांनी कौतुक केले आहे.

# श्री राम कथा ज्ञानयज्ञाच्या भव्य मंडपाचे आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते भूमिपूजन

**लातूर/प्रतिनिधी :** औसा तालुक्यातील किल्लारी येथे दि. २३ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत होणाऱ्या प.पू. राष्ट्रसंत मोरारी बापू यांच्या श्री राम कथा ज्ञान यज्ञाच्या भव्य मंडपाचे श्री निळकंठेश्वर सहकारी साखर कारखाना परिसरात भूमिपूजन शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. ही कथा दररोज सकाळी साडेनऊ ते दुपारी दिड या वेळेत होणार आहे. कथेसाठी उपस्थित राहणाऱ्या सर्व भाविक भक्तांसाठी दररोज महाप्रसादाचीही सोय करण्यात आली आहे.



आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते सभा मंडपाचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी लक्ष्मीरमणजी लाहोटी, ओमप्रकाश डागा , बियाणी, किल्लारीच्या सरपंच सुलक्षणा बाबळसुरे, माजी सरपंच डॉ. शंकर परसाळगे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. भूमिपूजन सोहळ्यानंतर श्री राम कथा संयोजन समितीच्या वतीने आ. पवार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना आ. अभिमन्यू पवार यांनी श्री राम कथेच्या श्रवणासाठी दररोज हजारोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास आपण सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले. श्री राम कथेच्या श्रवणासाठी हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती राहणार आहे. त्याकरिता आवश्यक तो पोलीस बंदोबस्त, आरोग्य सुविधाही उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याची माहिती आ. पवार यांनी दिली. माहेश्वरी समाजाच्या लातूर शहराध्यक्षपदी लक्ष्मीकांत सोनी यांची निवड झाल्याबद्दल यावेळी आ. पवार आणि डागा परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ईश्वरप्रसाद डागा यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कथेच्या आयोजनामागची पार्श्वभूमी विस्तृतपणे विशद केली. याप्रसंगी हुकूमचंदजी कलंत्री, राजेंद्र मालपाणी, दिनेश पपरूनिया, श्याम खटोड, शरद नावंदर, रमेश राठी, रामेश्वर सोमाणी, ईश्वर बाहेती, गोविंद धूत, श्याम धूत, विजय पस्तापुरे , हरीशभाई ठक्कर, रामबिलास लोया, हरिकिशन मालू, आनंद लाहोटी, बाळूसेठ बिदादा, दर्शन डागा , आकाश डागा, किरण झंवर, श्रीकांत बजाज, श्याम बांगड यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

➤ स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ➤ सोन्याच्या दागिन्याचा मुद्देमाल जप्त

# चोरी करणाऱ्या सराईत आंतरजिल्हा गुन्हेगारास अटक

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील मालमत्ता विषयक गुन्ह्यांवर प्रभावी आळा घालण्याच्या दृष्टीने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या अचूक नियोजन व धाडसी कारवाईत दोन सराईत आरोपींना अटक करून विविध पोलीस ठाण्यांतील चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा करण्यात यश मिळवले आहे.




दि. ३० एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मालमत्ता विषयक गुन्ह्यातील रेकॉर्डवरील आरोपी त्यांनी चोरी केलेले दागिने विक्री करण्याचा प्रयत्न करीत असताना कळंब रोड रेल्वे गेटजवळ हरंगुळ-वरवंटी शिवरस्त्यावर सापळा लावून दोन गुन्हेगार काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकलसह ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे १. सुमीत (वय २७ वर्षे, रा. मळवटी रोड, लातूर) २. आकाश ऊर्फ भावड्या (वय २६ वर्षे, रा. सिद्धेश्वर नगर, लातूर) झडती घेतली असता आरोपींकडून १५ ग्रॅम सोन्याचे दागिने, रोख रक्कम, लोखंडी टामी तसेच गुन्ह्यात वापरलेली काळ्या रंगाची पल्सर मोटारसायकल (क्र. MH-37 AC-4718) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीदरम्यान आरोपींनी सदर मुद्देमाल चोरीचा असल्याची कबुली दिली असून, मोटारसायकल पुणे येथून चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. पुढील तपासात आरोपींनी लातूर जिल्ह्यातील एमआयडीसी, अहमदपूर व शिवाजीनगर येथील प्रत्येकी एक गुन्हा असे एकूण तीन गुन्हे, तर बाहेर जिल्ह्यातील चाकण (पुणे), राहुरी (अहिल्यानगर), आंबेजोगाई शहर (बीड) येथील तीन गुन्हे असे एकूण ०६ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. सदर कारवाईमुळे पो.स्टे. एमआयडीसी, लातूर गु.र.नं. १८७/२०२६ सह इतर अनेक गुन्ह्यांचा उलगडा झाला असून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासह आरोपींना पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी पोलीस ठाणे एमआयडीसी यांचे ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांचे निर्देशन व अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पो. उपनि. राजेश घाडगे,सपोउपनि. सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार युवराज गिरी, राजेश कंचे,प्रदीप स्वामी,मोहन सुरवसे, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, प्रदीप चोपणे यांनी केली आहे. लातूर जिल्हा पोलीस नागरिकांना आवाहन करीत आहेत की, कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी. नागरिकांच्या सहकार्यामुळेच गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

## डॉ. कल्याण बरमदे यांना आ. अमित देशमुख यांच्या शुभेच्छा

**लातूर/प्रतिनिधी :** दि. ३ मे २०२६ राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. २ मे रोजी सायंकाळी लातुर तालुक्यातील हरंगुळ (बु) येथील जनकल्याण विद्यालया जवळील डॉ. कल्याण बरमदे यांच्या बरमदे ग्रीन्स येथे जाऊन डॉ. कल्याण बरमदे यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले, तसेच त्यांचा ५ मे रोजी वाढदिवस असल्याने त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, छत्रपती संभाजी नगर मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, मान्यवर उपस्थित होते.




## भारतलाल पिपलवा यांचे निधन



**लातूर/प्रतिनिधी :** येथील जुन्या काळातील बांधकाम गुत्तेदार व अनुभवी बांधकाम क्षेत्रातील तसेच रामदेव बाबाचे भक्त श्री.भारतलाल पिपलवा यांचे आकस्मित शनिवारी निधन झाले. ते अंदाज ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा व मुलगी, नातू, जावाई असा मोठा परिवार आहे. ते राजकुमार यांचे मोठे भाऊ तर चंदन पिपलवा यांचे ते वडील होते. लातूर येथील संतोषी मातेचे भक्त मोहनमहाराज खंडेलवाल यांचे ते भावजी होत. त्यांच्या आकस्मित निधनाने अनेकांनी तिव्र दुःख व्यक्त केले आहे. श्री भारतालाल यांचा स्वभाव मनमिळावू व धार्मिकवृत्तीचा होता. त्यांच्या आकस्मित निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले आहे. अनेकांनी घरी जावून परिवाराचे सांत्वन केले आहे.

# पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ६९ रुग्णांची तपासणी - उपचार




**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र दिन तसेच महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन, लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशन,आयएमए लातूर व पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या संयुक्त विद्यमाने येथील पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ६९ रुग्णांची तपासणी - उपचार करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांसाठी खोरी गल्ली परिसरातील विरंगुळा केंद्रात कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते.

पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित शिबिराचे उदघाटन पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती , लातूर ऑर्थोपेडिक असो.चे अध्यक्ष डॉ. गिरीश कोरे, सचिव डॉ. मन्सूर भोसगे, डॉ. चेतन सारडा, डॉ. द्वारकादास तापडिया, डॉ. इम्रान कुरेशी, श्याम धूत, प्रसाद उदगीरकर, पस्तापुरे , विजय रांदड, जितू बजाज, रामेश्वर सोमाणी, संजीव भार्गव आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पोद्दार हॉस्पिटल आणि मोफत अस्थिरोग शिबीर हे जणू आता लातूरकरांसाठी एक अद्वितीय समिकरणच बनले आहे. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेले आजचे हे १७४ वे मोफत शिबीर होते. आपण समाजाचेही काही देणे लागतो. ते अशा शिबिराच्या माध्यमातून केलेल्या रुग्णसेवेने साध्य होते, या विचाराने डॉ.अशोक पोद्दार मोफत रुग्णसेवेचा हा यज्ञ चालविण्याचे काम करत असतात.

यावेळी बोलताना पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनच्या स्थापना दिवसाचे औचित्य साधून आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. पाच सहा दिवस चालणाऱ्या या शिबिराच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. जास्तीत जास्त रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहनही त्यांनी केले.

राहुलकुमार मीना यांनी आपल्या मनोगतात रुग्णांनी या उपक्रमांचा लाभ घेऊन आपले आयुष्य निरोगी जगण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. पोद्दार हॉस्पिटलच्या मोफत अस्थिरोग शिबिराबाबतची ख्याती आपण ऐकून असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. अशोक पोद्दार यांनी आपल्या प्रास्ताविकात हा उपक्रम मागच्या नऊ वर्षांपासून राबविला जात असल्याचे सांगितले. सहा वर्ष बेस्ट उपक्रमाच्या आयोजनाचे पारितोषिकही मिळाल्याचे सांगितले. राज्यातील ३० हुन अधिक जिल्ह्यात अशा प्रकारचे उपक्रम डॉ. पराग संचेती यांच्या अध्यक्षतेखाली राबविण्यात येतात. आपल्या या कार्याची दखल ऑल इंडिया ऑर्थोपेडिक असो.च्या वार्षिक सोहळ्यातही घेतली गेली असून त्याचाही पुरस्कार मिळाला असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोद्दार हॉस्पिटलच्या या मोफत अस्थिरोग शिबिरात एकूण ६९ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यामध्ये ५७ रुग्णांची हाडांच्या ठिसूळतेची मोफत तपासणी करण्यात आली.यावेळी २८ रुग्णांचे एक्सरे, १८ रुग्णांची रक्त तपासणी तर ३२ रुग्णांची फिजिओथेरपी करण्यात आली. सर्व रुग्णांना मोफत औषधींचेही वितरण करण्यात आले. डॉ. अशोक पोद्दार, डॉ. इम्रान कुरेशी, डॉ. पल्लवी जाधव,डॉ. कपिल धुमुरे, डॉ. सिद्रामप्पा भोसगे ,डॉ. प्रशांत अंभोरे यांनी ऋणांची तपासणी केली. महाराष्ट्र ऑर्थोपेडिक दिनाचे औचित्य साधून लातूर शहरातील खोरी गल्ली परिसरातील ज्येष्ठांच्या विरंगुळा केंद्रात हाडांच्या आजारांविषयी कार्यशाळाही आयोजित केली गेली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष डॉ. काशिनाथराव सलगर हे होते. या वर्धापन दिनी ज्येष्ठ नागरिकांसाठी डॉ. गिरीश कोरे अध्यक्ष ऑर्थोपेडिक असोसिएशनचे यांनी तसेच डॉ. मन्सूर भोसगे व डॉ.विक्रम सूर्यवंशी या सर्वांनी ज्येष्ठांना ठिसुळ हाडाच्या बाबतीत व हाडांची घेण्यासाठी काळजी याबाबत आहार व्यायाम व काळजी याबाबत खूप छान मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव प्रकाश घादगिने यांनी केले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस तिन्ही डॉक्टरांचा सत्कार ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रकाश निला, रमेश भोयरेकर, वसंत बेंडे,शहाजी घाडगे, डॉ. भास्कर बोरगावकर आदींनी परिश्रम घेतले. अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६